पुणे, बुधवार, ५ जून २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 179 • वर्ष ३ रे, अंक १७९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

BEYOND THE NEWS
@rashtrasanchar.com

# राष्ट्रसंचार







## इंडियाचा.. दे धक्का !

# २९२

'नव्या उर्जेने पुढे जाऊ...'

अर्कचित्र : स्वप्नील कुंभार

## चार राज्यांत भाजपला अपयश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत भाजपचा विजयरथ चार राज्यांनी रोखला. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि राजस्थानमध्ये अनपेक्षितपणे पराभव पत्करावा लागला. त्यामुळे भाजप स्वबळावर सरकार स्थापन करू शकले नाही, असे जाहीर निकालांवरून स्पष्ट झाले. उत्तर प्रदेशमध्ये भाजपचे मोठे नुकसान झाले. येथे भाजप केवळ ३३ जागांवर आघाडीवर होते. २०१४ तसेच २०१९ मध्ये येथे भाजपने अनुक्रमे ७१ आणि ६२ जागा मिळवल्या होत्या.

महाराष्ट्रात रालोआ केवळ १७ जागांवर आघाडीवर होते. येथे उद्धव ठाकरे गट, शरद पवार गट आणि काँग्रेसने रालोआला चकीत केले. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने २९ जागांवर आघाडी घेतली होती. राजस्थानातही भाजपला २५ पैकी केवळ १४ जागांवर आघाडी मिळाली. २०१९ मध्ये भाजपने २५ जागांवर विजय मिळवला होता.

१८ महायुती

२९ आघाडी

०१ इतर

| | |
|---|---|
| १० | भाजपा |
| ०९ | उबाठा |
| ०७ | शिवसेना |
| १३ | काँग्रेस |
| ०७ | राष्ट्रवादी शरद पवार |
| ०१ | इतर |
| ०१ | राष्ट्रवादी अजित पवार |



२९२ एनडीए ▼

२३२ इंडिया ▲

१९ इतर

## विजय ऐतिहासिकच!

रालोआ सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करत असल्याने, हा विजय ऐतिहासिकच आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. जनतेने सलग तिसऱ्यांदा रालोआवर विश्वास दाखवला आहे! भारताच्या इतिहासातील ही एक ऐतिहासिक कामगिरी आहे. त्यासाठी मी जनता जनार्दन यांना प्रणाम करतो आणि त्यांना आश्वासन देतो की त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही गेल्या दशकात केलेले चांगले काम सुरू ठेवू, असे त्यांनी म्हटले आहे.



## पक्षांतरानंतर दादांची दमबाजी मतदारांनी नाकारली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रातील जनतेने अजित दादा पवार यांची दमबाजी नाकारल्याचे दिसून आले. राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ एका जागेवर विजय मिळाला. अजित पवार यांनी पक्षांतर केल्यानंतर केलेली दमबाजी मतदारांनी नाकारली असेच म्हणावे लागेल.

महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्या पाठोपाठ अजित पवार यांनी संपूर्ण पक्षच भाजपच्या दावणीला बांधला. देशात त्यामुळे खळबळ उडाली. पक्षांतरबंदी कायद्याची नव्याने आखणी करण्याची गरज तीव्र झाली. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सन्मानजनक जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे त्यांना जनतेने स्वीकारले आणि अजित पवारांच्या दमबाजीला नाकारले, असेच मानले जात आहे.

## भाजपच्या क्लीनस्वीपवर फेरले पाणी

**भाजपने अबकी बार ४०० पार ही केलेली घोषणा देशभरात चर्चेचा विषय ठरली. २०१४ तसेच २०१९ या निवडणुकीत भाजपला बहुमत मिळणार का, अशी चर्चा निकाल जाहीर होईपर्यंत कायम राहिली. यंदाच्या वेळी भाजप खरोखरच ४०० पार जाणार का, याचीच उत्सुकता मतमोजणीच्या दिवसापर्यंत कायम राहिली. भाजपच्या रालोआने २९२ जागांवर आघाडी घेत, बहुमताचा २७२ आकडा पार केला असला, तरी त्यातही रालोआची दमछाक झालेली दिसून आली. उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल येथे विरोधकांच्या आघाडीने जवळपास १०० जागा जिंकत भाजपला ३०० च्या आत रोखले.**

## शिवसैनिक ठाकरेंकडेच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रातील सामान्य शिवसैनिक हा उद्धव ठाकरे यांच्या मागे उभा राहिलेला दिसून आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझा पक्ष पळवला, चिन्ह पळवले असा उद्धव ठाकरे यांनी आक्रमकपणे केलेला प्रचार त्यांना घवघवीत यश मिळवून देणारा ठरला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सन्मानजनक जागा मिळाल्या असल्या, तरी ठाकरे गटासमोर त्यांची डाळ फारशी शिजली नाही. १३ ठिकाणी हे दोन्ही पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले होते. एकनाथ शिंदे यांची शिवसेना ७ जागांवर आघाडीवर होती. महाराष्ट्रात इतरत्र ठाकरे यांना मतदारांनी स्वीकारले. ९ जागांवर उद्धव ठाकरे गट आघाडीवर होता.





### पैलवानाने मारले मैदान; धंगेकरांना केले चितपट

## मुरलीधर मोहोळांची आता दिल्लीवारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

लोकसभा निवडणूक '२४

**पुणे :** पुणे लोकसभा मतदार संघात भाजपच्या मुरलीधर मोहोळ यांची जादु चालली. पुणे लोकसभा मतदार संघात काँग्रेसच्या रवींद्र धंगेकरांना मोठा धक्का बसला. पुण्यातला पैलवान दिल्लीला जाणार, अशी जोरदार घोषणाबाजी मोहोळ यांच्या कार्यकर्त्यांकडून कार्यालयासमोर करण्यात आली. आम्हाला विश्वास होता अण्णा निवडून येतील, अशी भावना मुरलीधर मोहोळांच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

पुणे लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्याविरोधात काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर उभे ठाकले होते. दोघांमध्ये चुरशीची लढत होती. तगडी फाईट असल्याने पुण्यात खासदार नेमका कोण होणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी दोघांनीही थेट आम्हीच जिंकणार असल्याचा दावा केला. प्रचारादरम्यान धंगेकरांनी मोहोळांवर आणि भाजपवर अनेकदा टीका केली. मात्र आता मुरलीधर मोहोळ यांच्या विजयाने या विषयावर पडदा पडला आहे. » पान ६ वर



**जल्लोष विजयाचा! पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या विजयाचा गुलाल उधळून आनंद साजरा केला.**

#रा

# निकालांचा संदेश

अठराव्या लोकसभेसाठी पार पडलेल्या निवडणूक निकालांमधून अनेक संदेश राजकीय पक्षांना आणि नेत्यांना मिळाले आहेत. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असणाऱ्या भारतातील मतदारराजा किती सुज्ञ आहे आणि त्याच्या राजकीय जाणिवा किती प्रगल्भ आहेत याची प्रचिती पुन्हा एकदा या निकालांनी अवघ्या जगाला दिली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांमध्ये भारतात १७ वेळा सार्वत्रिक निवडणुकांची प्रक्रिया पार पडली. यामध्ये स्वातंत्र्यलढ्यात सहभागी असणारा काँग्रेस पक्ष सर्वाधिक काळ सत्तेत राहिला असला तरी या पक्षालाही पराभवाचा सामना करावा लागला होता. १९७७ मध्ये इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीच्या विरोधातील असंतोष यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भारतीय मतदारांनी नोंदवला होता; परंतु जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली आकाराला आलेल्या जनता पक्षाचे सरकार जेव्हा अंतर्गत लाथाळ्यांनी ग्रासल्याचे दिसले तेव्हा त्यांनाही सत्तेतून खाली उतरण्याची शहाणीव भारतीय मतदारांनी दाखवली होती. १९९० च्या दशकानंतर केंद्रातील सत्तेमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेला २०१४ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पूर्ण बहुमत देत भारतीय मतदारांनी स्थैर्याला महत्त्व दिले. यामुळेच २०१४ ची निवडणूक ही भारतीय राजकारणाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानली गेली. २००४ आणि २००९ मध्ये केंद्रातील सत्तेमध्ये असलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळातील कथित भ्रष्टाचाराची प्रकरणे आणि निर्णयप्रक्रियेतील कमालीची उदासीनता, याखेरीज महागाई, बेरोजगारी या सर्वांनी ग्रासलेल्या जनतेने सत्तांतर घडवून आणले होते. २०१४च्या लोकसभा निकालांमध्ये काँग्रेस पक्षातील घराणेशाहीतील अनेक भक्कम गड ढासळताना दिसले. त्यातून प्रस्थापितांविरोधात जनतेमध्ये असणारा असंतोष स्पष्ट रुपाने दिसला होता. २०१४ मध्ये सत्तेत आलेल्या पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारच्या कारभाराबाबत संमिश्र स्थिती असूनही पुलवामामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर लढल्या गेलेल्या २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भारतीय मतदारांनी राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य देत पुन्हा एकदा मोदी सरकारच्या हाती सत्तेच्या चाव्या दिल्या होत्या. याखेरीज विधानसभा निवडणुकांसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्येही भारतातील ग्रामीण मतदारांनी वेळोवेळी राजकीय पक्षांना योग्य तो संदेश दिला असल्याचे गेल्या ७५ वर्षांत दिसून आले आहे. असे असूनही सत्ता मिळाल्यानंतर राजकीय पक्ष मतदारांना गृहित धरतात आणि तिथेच त्यांची फसगत होते. १८ व्या लोकसभेसाठी पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही हेच घडलेले दिसले. मागील दोन निवडणुकांमध्ये वाढलेला व्होट शेअर आणि वाढलेली जागांची संख्या यामुळे केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष मतदारांना गृहित धरु लागल्याचे गेल्या १० वर्षांत वारंवार दिसून आले. त्याच बळावर विरोधी पक्षातील नेत्यांना हीन लेखण्यापासून अर्थकारणाबाबतचे मनमानीपणाने निर्णय घेण्यापर्यंत अनेक पातळीवर हा गृहिततावाद फोफावल्याचे दिसले. सर्वांत मोठी बाब म्हणजे, केंद्रातील सत्तेच्या बळावर सरकारी यंत्रणांचा गैरवापर करु विरोधी पक्षांची सरकारे डळमळीत करणे, विरोधातील पक्ष फोडून राजकीय अस्थिरता निर्माण करणे यांसारखे लोकशाहीला अपेक्षित नसणारे घातक प्रयोग करण्याची जणू टूमच मोदी-शहा जोडगोळीच्या काळात भारतात फोफावली. ही बाब आपल्याला रुचली नसल्याचा स्पष्ट संदेश या निकालांमधून मतदारांनी दिला आहे.

याचे सर्वांत ठळक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील निकाल. महाराष्ट्रामध्ये २०१९ च्या विधानसभा निकालांनंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपापासून काडीमोड होत महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले होते. त्याचा बदला भाजपाने शिवसेना पक्ष हिसकावून घेत घेतला. एकनाथ शिंदेंसह अन्य शिवसेना नेत्यांच्या बंडापाठोपाठ शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्येही असाच प्रयोग घडवून आणण्यामध्ये भाजपाने मोठी भूमिका बजावली. राजकारणात नेत्यांची पक्षांतरे नवी नाहीत. पण ज्या नेत्यांनी पक्षाची स्थापना केली आणि तो विस्तारासाठी आपली हयात घालवली त्यांच्याकडून तो पक्ष आणि पक्षचिन्हच हिसकावून घेण्याचे घाणेरडे राजकारण महाराष्ट्रातील जनतेला पसंत पडलेले नाही, हे मतदानयंत्रातून मतदारांनी दाखवून दिले आहे. भाजपा, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांसह रिपाई, रासपा यांसह अनेक पक्ष महायुतीमध्ये सहभागी असूनही महाविकास आघाडीच्या उमेदवारांना ज्याप्रकारे राज्यात विजय मिळाला आहे, तो भाजपचा वाढलेला अहंकार, एकाधिकारशाही, मनमानी यांना मतदारांनी दिलेली सणसणीत चपराक आहे. या निकालाला अनेक पदर आहेत. प्रत्येक मतदारसंघाचे राजकीय गणित वेगळे आहे. त्याबाबत यथावकाश काथ्याकूट होईल. पण निकालाचा लसावि असे सांगतो की, मतदारांना गृहित धरू नका. देशाच्या राजकारणात उत्तर प्रदेशाचे स्थान सर्वांत वरचे आहे. या राज्यात लोकसभेच्या ८० जागा असल्यामुळे दिल्लीतील सत्तेचा मार्ग उत्तर प्रदेशातून जातो असे म्हटले जाते. २०१४ आणि २०१९ मध्ये उत्तर प्रदेशातील घवघवीत विजयामुळेच भाजपला सत्तेचा सोपान चढणे सोपे झाले होते. यंदाच्या निवडणुकांपूर्वी अयोध्येत राममंदिराची प्रतिष्ठापना करण्यात आल्यामुळे उत्तर प्रदेशामध्ये गेल्या वेळीपेक्षा अधिक जागा मिळतील असा विश्वास भाजपा नेतृत्वाकडून व्यक्त होत होता. परंतु सत्तेच्या आणि कथित लोकप्रियतेची जादू चढली की आपल्या परीघाबाहेरचे दिसेनासे होते. तोच प्रकार भाजपाबाबत उत्तर प्रदेशात झाला. नेहमीप्रमाणे मायावतींच्या माध्यमातून मतविभाजन होईल आणि राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी केलेली हातमिळवणी निष्प्रभ ठरेल या भ्रमामध्ये राहिलेल्या भाजपचा भोपळा मतदारांनी फोडला आहे. वाराणसी मतदारसंघामध्ये सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये खुद्द पंतप्रधान पिछाडीवर राहणे यातून भारतीय मतदारांच्या मनातील कल स्पष्ट होतो. निकालांच्या आकड्यांनंतरचे राजकारण अत्यंत महत्त्वाचे असणार आहे. कारण आता भाजपासाठी केंद्रातील सत्ता टिकवण्यासाठी नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांची मदत मोलाची ठरणार आहे. काँग्रेस आणि शरद पवारांकडून या दोन्ही नेत्यांना आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न सुरू झाल्याचे समोर आले आहेत. त्यामुळे अब की बार ४०० पारच्या स्वप्नरंजनात असणाऱ्या भाजपासाठी अब की बार, येणार का सरकार असा विचार करण्याच्या स्थितीमध्ये मतदारांनी आणून ठेवले आहे. या जनादेशाचा आदर करणे ही लोकशाहीतील अपरिहार्यता आहे; पण त्यातील संदेश ओळखता आला नाही तर पुढील वाटचाल खडतर राहील यात शंका नाही.

डेन्मार्कच्या कोपनहेगन विद्यापीठातील संशोधकांनी भारतातील सावलीच्या झाडांबाबत अतिशय चिंताजनक चित्र मांडले आहे. नेचर सस्टेनेबिलिटी जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, गेल्या पाच वर्षांत भारतीय शेतातून कडुनिंब, महुआ, जामुन आणि शिसम सारखी ५३ लाख सावलीदार झाडे गायब झाली आहेत. याचे कारण शेतकरी सावली देणारी झाडे पीक उत्पादन वाढविण्यात मोठा अडथळा मानतात. पण शहरांमध्ये अशी झाडे तोडून निसर्गाचा लय बिघडवण्याची चूक माणसाने केली असून, त्याचे परिणाम आता भोगावे लागत आहेत. पण यातून बोध घेण्याऐवजी कोकणातील डोंगरउतारावर, पश्चिम घाटातील भूक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वृक्षांच्या कत्तली सुरू आहेत आणि त्यांची जागा नगदी पिके घेत आहेत. यातून भविष्यात तापमानवाढ यांसारख्या भीषण संकटाला सामोरे जावे लागणार आहे.

# सावलीदार झाडे गेली कुठे?

डेन्मार्कमधील कोपनहेगन विद्यापीठातील संशोधकांनी तयार केलेला एक अभ्यास अहवाल अलीकडेच नेचर सस्टेनेबिलिटी या जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे. या संशोधकांनी २०१८ ते २०२२ या काळात भारताच्या ग्रामीण भागातील शेतीपरीसरात असणाऱ्या वृक्षांचा अभ्यास केला आहे. त्यातून त्यांना असे लक्षात आले आहे की, या कालावधीमध्ये सुमारे ५३ लाख वृक्ष नष्ट झालेले आहेत. संशोधकांनी केवळ तेलंगणा, आंध्र प्रदेश, केरळ, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा, काश्मीर व मध्य प्रदेशातील काही भागातच हे सर्वेक्षण केलेले आहे. तसेच हा अभ्यास केवळ शेतीपरीसरातच करण्यात आला आहे. विकास प्रकल्पांसाठी, रस्तेप्रकल्पांसाठी करण्यात आलेल्या वृक्षतोडीचा यामध्ये समावेश नाही, हे लक्षात घ्यायला हवे. त्यांनी केवळ शेतीच्या बांधावरील व शेतीपरिसरातील वृक्षांची पाहणी करुन अहवाल तयार केलेला आहे. त्यामध्ये संशोधकांना असे लक्षात आले की, सर्वाधिक वृक्षतोड ही तेलंगणा आणि महाराष्ट्रात वरील कालावधीत झालेली आहे.

या सर्वेक्षणामध्ये त्यांनी काही निरीक्षणेही नोंदवली आहेत. तसेच या वृक्षतोडीची कारणेही दिलेली आहेत. त्यानुसार ही वृक्षतोड प्रामुख्याने शेती करण्यासाठी, विशेषतः भातशेतीसाठी करण्यात आली आहे. दुसरे निरीक्षण म्हणजे तोडलेल्या झाडांच्या ठिकाणी एकाच जातीच्या (मोनोकल्चर) किंवा काहीशा वेगळ्या जातीच्या, व्यावसायिक दृष्ट्या फायदेशीर असणाऱ्या झाडांची लागवड केली जात आहे. यापूर्वी आपल्या वनखात्यानेही डोंगर उतारावर, पडीक जमिनीवर मोनोकल्चर म्हणजे एकाच जातीची झाडे लावण्याचा उपक्रम राबवलेला आहे. यामध्ये निलगिरी, ऑस्ट्रेलियन बाभूळ यांसारख्या विदेशी वृक्षांचा समावेश अधिक प्रमाणावर होता.

वृक्षतोडीचे तिसरे कारण देताना संशोधक असे नमूद करतात की, शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार बांधावरील वृक्षांच्या सावलीमुळे पीकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीच्या बांधावरील सगळे वृक्ष तोडले. महाराष्ट्रात ही स्थिती उघडपणे दिसून येते. पूर्वीच्या काळी शेतीच्या बांधावर विविध प्रकारचे वृक्ष पाहायला मिळत. पण आधुनिक शेतीमध्ये शेतकऱ्यांनी बांधावरची आणि आजूबाजूची सर्व झाडे तोडून टाकली. यासाठी शेतकऱ्यांनी दिलेले सावलीचे कारण काही अंशी खरे आहे; पण सर्वच वृक्ष तोडणे चुकीचे आहे. शेतीच्या बांधावरील वृक्षांचे अनेक फायदे आहेत. पहिला फायदा म्हणजे शेतातील पिके फस्त करणाऱ्या किंवा पीकांवर विविध रोग निर्माण करणाऱ्या किटकांमुळे पीकांचे मोठे नुकसान होत असते, हे किटक खाण्याचे काम पक्ष्यांकडून केले जाते. किंबहुना, पक्ष्यांची नैसर्गिक उपजीविका किटक भक्षणावरच असते. पण बांधावरील झाडे तोडल्यामुळे पक्ष्यांची आश्रयस्थानेच नष्ट झाली आहेत. पक्षी कधीही थेट जमिनीवर उतरत नाहीत. झाडांवर बसून नंतर ते खाली येतात. पसरलेल्या शेतीवर उडत जाणारा पक्षी थेटपणाने खाली येऊन किटक खात नाहीत. कालोघात ही गोष्ट शेतकऱ्यांच्याही लक्षात आली आहे. बांधावरील झाडे तोडल्यामुळे पीके नष्ट करणाऱ्या किटकांचे, किटकजन्य आजारांचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे. आता किटक निर्मूलनासाठी शेतकरी अत्यंत विषारी किटकनाशके वापरत आहेत. पण ही सर्व औषधे पर्यावरणाला आणि मानवी आरोग्याला अत्यंत घातक आहेत. भारतात तर अशा प्रकारची काही किटकनाशके वापरली जातात ज्यांना जगभरातील बहुतांश देशांनी बंदी घातली आहे. यातील मोठ्या प्रमाणावर किटकनाशके ही कर्करोगास निमंत्रण देणारी असल्याचे सिद्ध झाले आहे. म्हणजेच बांधावरील वृक्षतोड करुन आपण मानवी जीवन धोक्यात आणले आहे, याचा विचार शेतकऱ्यांनी करायला हवा.

सदर संशोधकांनी शेतीच्या अवतीभवती वृक्षलागवड करणे तसेच डोंगर उतारावर वनशेती करणे गरजेचे असल्याचे म्हटले आहे. आपल्या शासनाने, वनविभागाने, कृषीविभागाने शेतकऱ्यांनी वनशेती करावी यासाठी बरीच खटपट केलेली आहे. पण आपला शेतकरी त्याकडे वळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. याला कृषीवनीकरण म्हणतात. यामध्ये आपल्या प्रदेशामध्ये असणाऱ्या झाडांची लागवड केली जाते. त्यामध्ये चांगले उत्पन्न देणाऱ्या झाडांचा विचार केला जातो. उदाहरणार्थ, सागवानाची लागवड केल्यास साधारणतः १५ वर्षांनी चांगले उत्पन्न मिळते. पण कुठलाही शेतकरी बांधावर अथवा डोंगर उतारावर सागवानाची शेती करताना दिसत नाही. शिसम वृक्षाची लागवडही अशीच फायदेशीर आहे. हे लक्षात घेऊन या संशोधकांनी कृषीवनीकरणाला चालना दिली जावी असे सुचवले आहे. याचे अन्यही अनेक फायदे आहेत. या वृक्षांमुळे परिसरात गारवा निर्माण होतो. जमिनीची धूप रोखली जाते. मातीची सुपिकता वाढते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वृक्षआच्छादन असणाऱ्या भूक्षेत्रात भूजल पातळी वाढते. सध्याच्या वाढत्या उष्म्याच्या आणि जलटंचाईच्या पार्श्वभूमीवर वृक्षांचे हे महत्त्व अधोरेखित झाले आहे; पण तरीही आपण याबाबत जागे झालेलो नाहीत, ही शोकांतिका आहे.

उलटपक्षी सध्याची आपली भूमिका ही वृक्षविरोधी आणि निसर्गद्रोही आहे. विशेषतः कोकणामध्ये किंवा पश्चिम घाटातील भूप्रदेशामध्ये राब जाळण्याची पद्धत आहे. यामध्ये झाडाच्या फांद्या तोडल्या जातात, पाने तोडली जातात आणि ती वाळवून पेटवली जातात. त्याच्या राखेमध्ये शेती केली जाते. छत्तीसगडमध्ये आणि महाराष्ट्रात कुमरी शेतीही केली जाते. यामध्ये जंगले पेटवून दिली जातात. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड-आजऱ्यामध्ये आजही अशी शेती केली जाते. कोकणामध्येही ती होते. यामध्ये जंगल पेटवून दिल्यानंतर ती आग शांत झाल्यावर तेथे बियाणे फेकले जाते आणि शेती केली जाते. यावर्षी एक एकरचे जंगल जाळले तर पुढच्या वर्षी दुसऱ्या भागात जातात. आठ ते दहा वर्षांनी पहिल्यांदा जाळलेल्या भागात येऊन शेती केली जाते. यामध्ये जंगलांचा किती विनाश होतो, याची मोजदाद नाही. ही बाब पर्यावरणविज्ञानाच्या विरुद्ध आहे.

कोपनहेगन विद्यापीठातील संशोधकांनी २०१८ ते २२ या काळाचा अभ्यास केला आहे; पण त्यापूर्वीच्या काळातही तीच परिस्थिती होती. उदाहरणार्थ, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये समृद्ध जंगल होते. हे जंगल तोडून तिथे चहा-कॉफीचे मळे तयार करण्यात आले आहेत. यामध्ये किती मोठ्या प्रमाणावर वनसंपदा नष्ट झाली याची कल्पनाही करता येणार नाही !

महाराष्ट्रात गगनबावडा तालुका हा कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वाधिक पाऊस पडणारा प्रदेश. तिथे संरक्षक वनक्षेत्र नाहीये. ते केवळ राधानगरीमध्ये आहे. पश्चिम घाटातील महाराष्ट्रात येणाऱ्या भागात प्रामुख्याने खासगी वने अधिक आहेत. गगनबावड्यामध्ये डोंगरउतारावर पूर्वी सुंदर घनदाट जंगल होते. हळूहळू ते जंगल तोडले गेले आहे. वास्तविक, यासंदर्भात काही निर्बंध आहेत. पण वनखात्याला हाताशी धरून डोंगउतारावरची ही झाडे तोडून तेथे सपाटीकरण केले जात आहे. झाडे तोडून टाकल्यामुळे आणि सपाटीकरणामुळे तेथील माती सैल झाली आहे. ही सुपीक माती पावसामुळे नदीनाल्यांमध्ये वाहून जाते आणि ती जमीन नापीक बनते. अलीकडील काळात या जमिनीवर हट्टाने उसाचीही लागवड केली जात आहे. वास्तविक तेथील उसाला साखरउतारा कमी असतो. पण गगनबावडा तालुक्यात, कोकणातही राजकीय नेत्यांचे साखर कारखाने उभे राहिले आहेत. पूर्वीपासून कोकण हा भातासाठी सुप्रसिद्ध आहे. पण तेथे आता ऊस लागवड वाढत आहे. आज कोकणातील खासगी जंगलही नष्ट होत चालले आहे. याचा निसर्गावर आणि पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

केवळ शेतीसाठी होणाऱ्या वृक्षतोडीचे हे भीषण वास्तव आहे. देशातील विकास प्रकल्पांसाठी, रस्तेमार्गांसाठी लाखो वृक्षांच्या खुलेआम कत्तली केल्या जात आहेत. आज भारतामध्ये केवळ २० टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सरकारी आकडेवारी सांगत असली, तरी प्रत्यक्षात त्याहून कमी वने शिल्लक आहेत. आज शहरांमध्येही वृक्षआच्छादन कमी झालेले आहे. बांधकामाआड झाड आल्यास कसलाही विचार न करता ते तोडले जाते. त्यासाठी ५ ते १० हजार रुपये दंड केला जातो. पण एका १०० वर्षांच्या झाडाचे पर्यावरणीय मूल्य १ कोटी रुपये आहे हे सिद्ध झाले आहे. या हिशेबाने गेल्या काही वर्षांत तोडलेल्या झाडांचे मूल्य किती असेल? त्याच्या तुलनेत आपण केलेल्या विकासाचे मोल निश्चितच उणे भरेल. मग आपण साधले तरी काय?

– प्रा. डॉ. मधुकर बाचुळकर
ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ, कोल्हापूर

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

बुधवार, दिनांक ५ जून २०२४ **वैशाख** कृ. १४, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, उत्तरायण. वसंत ऋतू. **नक्षत्र** : कृत्तिका, योग : सुकर्मा करण : विष्टि जागतिक पर्यावरण दिवस, अमावस्या प्रारंभ रात्रौ ७.५५ सूर्योदय : स.०६.०८ सूर्यास्त : सायं.०७.१८ वा. **राहू काळ** : दुपारी : १२:०० ते १:३०

### दिनविशेष

*१९५२ : भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोलंबिया विद्यापीठाची डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी प्रदान करण्यात आली. *१७२३ : ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथचा जन्म. *१७८३ : जोसेफ आणि एतिएन मॉतगोल्फिए बंधूंचे पहिले गरम हवेने बलून सहा हजार फूट उंचीवर जाऊन परतले. *१७९९ : आधुनिक रशियन साहित्याचे जनक, श्रेष्ठ कवी, कथाकार आणि नाटककार अलेक्झांडर पुष्किन यांचा जन्म. *१८७९ : संघटित कामगार चळवळीचे जनक नारायण मल्हार जोशी यांचा जन्म. *१८८१ : प्रसिद्ध हार्मोनिअमवादक गायक अभिनेते गोविंद सदाशिव टेंबे यांचा जन्म. *१९०९ : अभिनव मराठी ज्ञानकोशकार गणेश रंगो भिडे यांचा जन्म. त्यांनी पु.ल. देशपांडे यांच्यासह 'कोल्हापूर दर्शन' हा ग्रंथप्रकल्प केला होता. *१९३३ : साहित्यिक वसुधा माने यांचा जन्म. *१९४३ : अमेरिकन कृषीतंत्रज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांचे निधन. *१९६७ : सिक्स डे वॉर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ईस्त्राईल अरब युद्धाची सुरुवात.

### राशीभविष्य

***मेष** : सर्दी-पडसे, थकवा जाणवेल. ***वृषभ** : सहकार्याचे वातावरण राहील. ***मिथुन** : कामे वाढतील. ***कर्क** : संततीचा सहवास लाभेल. ***सिंह** : कामात शिथीलता येईल. ***कन्या** : गाठी-भेटी, प्रवास इ. साठी खूप धावपळ होईल. ***तुळ** : कौटुंबिक खर्चासाठी पैसा उपलब्ध होईल. ***वृश्चिक** : उत्साही रहाल. शेतीच्या कामात गुंतवणूक कराल. ***धनु** : कामाचा कंटाळा येईल. ***मकर** : आर्थिक लाभाच्या घटना घडतील. ***कुंभ** : कार्य साफल्याचा आनंद मिळेल. ***मीन** : वरिष्ठांची मर्जी सांभाळा.

### मेसेज आया

शब्दातून दुःख व्यक्त करता आले असते तर अश्रूंची गरज भासली नसती. सर्व काही शब्दात सांगता आले असते तर भावनांना किंमतच उरली नसती.



### व्यक्तीविशेष

## रमेश कृष्णन

भारतीय टेनिसपटू रमेश कृष्णन यांचा जन्म ५ जून १९६१ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे वडील रामनाथन कृष्णन हेही टेनिसपटू होते. १९७० च्या दशकात ज्युनियर टेनिसपटू म्हणून त्यांनी विम्बल्डन आणि फ्रेंच ओपन दोन्ही स्पर्धा जिंकल्या. ८० च्या दशकांत तीन



ग्रँड स्लॅम स्पर्धांमध्ये ते उपउपांत्य फेरीपर्यंत पोचले होते. १९८७ मध्ये डेविस चषक स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत पोचला होता. त्या संघात रमेश कृष्णन होते. कृष्णन यांनी १९८९ च्या ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये त्यावेळचा जगातील क्रमांक एकचा टेनिसपटू मॅट्स विलँडर यालाही पराभूत केले होते. १९९३ मध्ये रमेश कृष्णन टेनिसमधून निवृत्त झाले. १९९८ मध्ये त्यांना पद्मश्री किताबाने गौरविण्यात आले.

### व्यक्तिमत्व

## विकासाचा मूलमंत्र

ते रोज रात्री उद्याच्या कामांची यादी करायला लागले.कामे आटोपायला लागली आणि रात्री झोपही यायला लागली. व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे फार काही गुंतागुंतीचे काम नाही. आपले जीवन सुखी, समाधानी आणि समाजाच्या उपयोगाचे कसे करावे याचा तो मंत्र आहे. एखादा सोपा मंत्र आपल्या जीवनातले अवघड प्रश्न सोडवू शकतो. तसे नारायणराव कार्यक्षम होते, आपण समाजासाठी काही तरी केले पाहिजे या कल्पनेने प्रेरित झालेले होते पण अनेक कामांचा गोंधळ ही त्यांच्या जीवनातली समस्या होती. ती या एका सूचनेने सुटली. या ठिकाणी नारायणरावांचे उदाहरण देण्यामागचा हेतू वेगळा आहे. एखाद्या शिबिरातली एखादी सूचना आपले सारे जीवन कशी बदलून टाकू शकते हे कळावे म्हणून हे उदाहरण दिले. कोणतेही शिबीर वाईट नाही. मोठ्या मानसशास्त्रज्ञांच्या दृष्टीने काही शिबिरे सामान्यही असतील पण त्यातून असा एखादाही मंत्र मिळत असेल तर त्या शिबिराला उपयुक्तच मानावे लागेल. (समाप्त)

### जिज्ञासा

## शोध इलेक्ट्रॉनचा

इलेक्ट्रॉनचा शोध लावून भौतिक शास्त्राचे प्रसिद्ध वैज्ञानिक जे. जे. थॉमसन यांनी विज्ञानक्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली. याबद्दल त्यांना १९०६ मध्ये नोबेल पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. थॉमसन यांनी कॅथोड किरण आणि कॅथोड किरण ट्युब यावर बरेच प्रयोग केले. याद्वारे त्यांनी १८९७ मध्ये इलेक्ट्रॉनचा शोध लावला. या शोधामुळे विज्ञानजगतात क्रांती झाली. कॅथोड किरणांच्या एकत्रिकरणाच्या शोधात असताना थॉमसन यांनी आयनित निऑन याचा प्रवाह चुंबकीय आणि विद्युत क्षेत्रामधून जाऊ दिला. एका फोटोग्राफीक प्लेटला या किरणांच्या मार्गामध्ये ठेवून त्या किरणांचे मार्गक्रमण आणि विचलन यांचे मोजमाप घेतले. यावेळी थॉमसन यांनी फोटोग्राफिक प्लेटवर प्रकाशाचे काही डाग बघितले. (पूर्वार्ध)

### नवं संशोधन

## माकडांची नवी प्रजाती

अलीकडेच आफ्रिकेतील कांगो देशामध्ये माकडांची एक नवी प्रजाती आढळली आहे. त्यांचे नाव लेसुला आहे. आफ्रिकेच्या दाट जंगलांमध्ये गेल्या २८ वर्षांत माकडांची ही दुसरी प्रजाती शोधून काढण्यात आली आहे. सस्तन माकडांच्या अशा प्रजातीचा उल्लेख जीव शास्त्रात दुर्मिळपणेच आढळतो. लेसुला जातीच्या माकडाला जीवशास्त्रीय व्याख्येनुसार 'सेरकोपिथेकस लेमेमीएनिसीस' असे म्हणतात. याचा चेहरा सपाट असतो आणि चेहऱ्याच्या चारी बाजूंनी सोनेरी भुरकट रंगाचे केस असतात. घुबडासारखा याचा चेहरा असतो. हे माकड लाजाळू आणि शांत स्वभावाचे असते. जमीन आणि झाडांवर दोन्ही ठिकाणी हे राहते. कांगोच्या वर्षावनामध्ये मीडल लोमामी आणि अप्पर शुआपा या नद्यांच्यामधील जागेमध्ये ६ हजार पाचशे वर्ग मैल क्षेत्रफळात पसरलेल्या जंगल क्षेत्रात अतिशय कमी संख्येत हे माकड आढळले आहे. (पूर्वार्ध)

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४**

| | | | |
|---|---|---|---|
| | 3 | 1 | 4 |
| 1 | | | |
| 4 | | 2 | 3 |
| | 2 | 4 | |

**क्रमांक ३ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 1 | 4 | 2 |
| 2 | 4 | 3 | 1 |
| 1 | 3 | 2 | 4 |
| 4 | 2 | 1 | 3 |


### हसा चकटफू

बन्याचे वय लग्नाचे झाले होते. त्याचे वडील त्याला म्हणाले, तुझ्या आजोबांनी लग्न केले आणि पस्तावले. मी लग्न केले आणि मीही पस्तावलो. आता आमच्या अनुभवांवरुन तू काय ठरवलेस ते बघ. बन्या म्हणाला, मी परंपरा मोडणार नाही. मीही लग्न करेन आणि पस्तावेन!

### महिलायन

## ऑयली स्किनसाठी...

त्वचेचे निरनिराळे प्रकार असतात. सामान्य त्वचा, कोरडी त्वचा, ऑईली त्वचा यापैकी ऑईली त्वचेच्या देखभालीसाठी क्लीझींग करणे सर्वात महत्वाचे असते. खास करून त्वचेची प्रवृत्ती जर वातावरणातील धूळ आणि प्रदुषण आकर्षित करून घेण्याची असेल तर क्लीझींग अत्यावश्यक ठरते. त्वचेचा पृष्ठभागावर येणारे तेल नेहमी स्वच्छ करत राहिले पाहिजे. तसेच त्वचेवरील रोमछिद्रेदेखील यापासून सुरक्षित ठेवले पाहिजे. याचा अर्थ दिवसभर चेहरा साबण आणि पाण्याने धुवत राहिले पाहिजे असे होत नाही. कारण जास्त साबण आणि पाण्यामुळे त्वचेचे सामान्य ॲसीड-अल्कलाईन याचे संतुलन बिघडते. यामुळे फुटकुळ्या आणि मुरुमांची समस्या वाढते. म्हणून दिवसातून केवळ दोन ते तीन वेळा त्वचा स्वच्छ करावी. नेहमी सामान्य ते तेलकट त्वचेसाठी बनवलेल्या क्लीझरचाच वापर करावा. चेहरा धुतल्यानंतर कापसावर ॲस्ट्रीजंट घेऊन त्याने चेहरा पुसावा.



ॲस्ट्रीजंट लोशन आणि रोजवॉटर समप्रमाणात एकत्र करून त्याचाही वापर करता येऊ शकतो. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी रोजवॉटर आणि काकडीचा रस समप्रमाणात एकत्र करून त्वचेचे टोनिंग करण्यासाठी आणि तेलकटपणा कमी करण्यासाठी वापरण्यास हरकत नाही. तसेच ऑईली त्वचेच्या देखभालीसाठी स्क्रबिंगही आवश्यक असते. स्क्रब करताना अतिशय हळूवारपणे हात चेहऱ्यावर फिरवावे आणि नंतर पाण्याने चेहरा धुवावा. यामुळे मृतपेशी निघून जातात आणि चेहऱ्यावरील रोमछिद्रे खोलपर्यंत स्वच्छ होतात. यामुळे त्वचेचा पोत सुधारतो. आपण घरच्या घरीदेखील स्क्रब बनवू शकतो.

तांदुळ पिठीमध्ये गुलाबजल घालून त्याची पातळसर पेस्ट बनवावी आणि ती चेहऱ्यावर हलक्या हाताने गोलाकार पद्धतीने चोळावी आणि त्यानंतर चेहरा धुवून टाकावा. यामुळे ब्लॅकहेडस्पासून त्वचेचा बचाव तर होईलच पण त्याचबरोबर रोमछिद्रे बंद होण्यासाठीदेखील मदत मिळेल. चेहऱ्यावर मुरुमे असेल तर मात्र स्क्रबचा वापर करू नये. (पूर्वार्ध)

### गंमतग्यान

## वाघ का करतात नाईटशिफ्ट?

वाघ दिवसा आराम करतात आणि रात्री काम करतात म्हणजे शिकार करतात. याचे कारण शास्त्रज्ञांनी शोधले आहे. नेपाळमधील वाघ मानवाशी संघर्ष टाळण्यासाठी नाईट शिफ्ट करतात, म्हणजे दिवसा आराम आणि रात्री शिकारीला बाहेर पडतात, असे त्यांचे म्हणणे आहे. सर्वसाधारणपणे वाघ दिवस आणि रात्रीत फरक न करता जंगलांमध्ये फिरत असतात, प्रणयाराधन करतात आणि शिकारही करतात, त्याचबरोबर आपल्या क्षेत्रावर पहाराही करतात. पण नेपाळच्या चितवन अभयारण्यात झालेल्या एका संशोधनात आढळून आले आहे की वाघ माणसांपासून वाचण्यासाठी रात्रीच आपली कामे उरकतात. शास्त्रज्ञांच्या आंतरराष्ट्रीय गटाने केलेले हे संशोधन प्रोसिडींग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. (पूर्वार्ध)

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com



लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत विजय स्व. नेते गिरीश बापट यांना समर्पित करतो. त्यांच्या निधनाने पोट निवडणुकीतील पराजयानंतर आमच्या हातून कसबा गेला असे, बोलले गेले. परंतु या निवडणुकीत कसबा मतदारसंघातून मताधिक्य मिळवत कसब्यावर आमचे वर्चस्व सिद्ध केले आहे. महायुतीतील सर्व वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र यांच्या पाठबळावर मी निवडून आलो. आता रस्ते, विमानतळ आणि मेट्रो विस्तारीकरण, पीएमपीएल सक्षमीकरण आणि विशेषत: दोन्ही कॅन्टोन्मेंट बोर्ड पालिकेत समाविष्ट करण्यासाठी पाठपुरावा करणार. — खा. मुरलीधर मोहोळ

# पुण्यात अण्णाच

## मुरलीधर मोहोळ १ लाख २० हजार २३४ मतांनी विजयी

**पुणे :** पुणे शहर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हे १ लाख२० हजार २३४ मतांनी विजयी झाले आहेत. महाविकास आघाडिचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी अपेक्षेप्रमाणे निवडणुकीत चुरस निर्माण केली होती. परंतु त्यांना यश मिळाले नाही. या विजयानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी काय म्हणतात पुणेकर निवडून आला मुरलीधर अशा घोषणा, गूलाल उधळत आणि ढोल ताशाच्या ठेक्यावर नाचत आनंदोत्सव साजरा केला परंतु जोरदार पावसामुळे त्यांच्या उत्साहावर पाणी पडले. मोहोळ यांनी पाच लाख ८१ हजार ६१२ मते घेतली तर दंगेकर यांनी चार लाख 61 हजार ३७८ मते मिळाली. मागील दोन लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार तीन लाखाहून अधिक मतांनी विजय झाले होते. यावेळी मात्र हे मताधिक्य सुमारे दोन लाखांनी कमी झाले आहे. मात्र मोहोळ यांनी भाजपचा गड कायम राखण्यात यश मिळवले आहे. सकाळी आठ वाजता कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्य धान्य महामंडळाच्या गोदामात पुणे शहर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी सुरू झाली. पहिल्या फेरीपासूनच मोहोळ यांनी आघाडी मिळवित शेवटीच्या एकवीसाव्य फेरीपर्यंत कायम राखली. कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत विजय मिळवून जायंट किलर ठरलेले रवींद्र धंगेकर यांना लोकसभा निवडणुकीत कसबा मतदार संघात मताधिक्य मिळू शकले नाही कसबा विधानसभा मतदारसंघात मोहोळ यांना १५००० हून अधिक मताधिक्य मिळाले त्याचप्रमाणे कोथरूड विधानसभा मतदारसंघातून मोहोळ यांनी निर्णायक ७५ हजार मतदारांची मतांची आघाडी घेऊन विजय निश्चित केला पुणे कॅन्टोन पेंट विधानसभा मतदारसंघ वगळता इतर पाच मतदार संघात मोहोळ यांना धंगेकर यांच्यापेक्षा अधिक मते मिळाली. दुपारी बारा वाजता मतमोजणीच्या दहा फेऱ्या पूर्ण झाल्या होत्या यामध्ये मोहोळ यांनी पन्नास हजाराहून अधिक मते घेत आपला विजय निश्चित केला होता त्यानंतर मात्र प्रत्येक फेरीत आघाडी घेऊन मताधिक्य एक लाखापेक्षा अधिक मते मिळविली.

### मुरलीधर मोहोळ यांनी मारली बाजी

पुणे लोकसभा मतदारसंघांमध्ये अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीमध्ये अखेर महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहळ यांचा विजय झाला. महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना एक्झिट पोलमध्ये आघाडीवर दाखवण्यात आले होते. मात्र तरीदेखील आपणच विजय होणार हा विश्वास रवींद्र धंगेकर यांना होता. मात्र मुरलीधर मोहोळ यांचा विजय निश्चित झाला आहे. त्यांचा तब्बल ९० हजरांवरून जास्त मताधिक्य त्यांना मिळाले आहे. पुणे लोकसभा मतदारसंघांमध्ये यंदा चौरंगी लढत पाहायला मिळाली. महायुतीचे मुरलीधर मोहळ, महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर आणि वंचित बहुजन आघाडीचे वसंत मोरे यांच्यासह एमआयएमचा देखील उमेदवार रिंगणात होता. मात्र खरी लढाई ही महाविकासाकडे आणि महायुतीच्या उमेदवारांमध्ये झाली.

सुरुवातीला एकतर्फी वाटणाऱ्या निवडणुकीमध्ये शेवटी रवींद्र धंगेकर यांनी चुरस आणली होती. काँग्रेसने देखील या लोकसभा मतदारसंघांमध्ये आपली राज्यातील पूर्ण ताकद लावून नागपूर येथील दहा आमदारांना वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघात ऍक्टिव्ह केलं होतं.

तसेच राहुल गांधी यांची सभा देखील घेण्यात अली. मात्र याचा फारसा फायदा धंगेकर यांना झालेला पहिला मिळत नाही. तसेच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे यांना २४ हजार मते घेतली आहेत.

प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात एकतर्फी वाटणारी निवडणूक शेवटच्या टप्प्यात धंगेकरांनी काहीशी फिरवल्याचे चित्र दिसून आले.त्यामुळे मागील निवडणुकी प्रमाणे मोठा विजय साकार करण्यात भाजपाला यश आले नाही.

### कसब्यात झाला घात

कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीमध्ये आमदार रवींद्र धंगेकराना १२००० मतांनी विजयी करणाऱ्या कसब्यानेच धनगेकरांचा घात केला असल्याचा समोर येत आहे. सर्व फेऱ्यांमध्ये कसबा विधानसभा मतदारसंघांमध्ये मुरलीधर मोहोळ यांनी आघाडी घेतली असून धंगेकर आमदार असलेल्या मतदार संघात त्यांना आघाडी मिळत नसल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.







**पुणे लोकसभा मतदारसंघात चुरशीली लढाई होती. मुरलीधर मोहोळ विरुद्ध रवींद्र धंगेकर अशी लढत होती. यंदाच्या प्रचारादरम्यान दोघांनी एकमेकांवर टीका केली मात्र धंगेकरांच्या घोषणेची किंवा नाऱ्याची चांगलीच चर्चा रंगली होती काय म्हणता पुणेकर निवडून येणार धंगेकर, असा नारा दिला होता. याच नाऱ्यावरुन मुरलीधर मोहोळ जिंकून आल्यावर मोहोळांच्या कार्यकर्त्यांनी थेट 'काय म्हणता पुणेकर, निवडून आलाय मुरलीधर', असे बॅनर लावून धंगेकरांना डिवचले.**



महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांची पुणे लोकसभा मतदारसंघाच्या खासदारपदी प्रचंड बहुमताने निवड झाल्याबद्दल पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी शिंदेशाही पगडी घालून अभिनंदन करत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### पुणेकरांनी वसंत मोरेंना नाकारले

लोकसभा निवडणुकीपूर्वी मनसेमध्ये अस्वस्थ असलेले वसंत मोरे यांनी राज ठाकरे यांची साथ सोडली. त्यानंतर निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला. आधी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून चाचपणी केली. परंतु तो प्रयोग यशस्वी होत नसल्यामुळे वसंत मोरे यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित आघाडीची साथ धरली आणि लोकसभेच्या रिंगणात उडी घेतली. परंतु या रिंगणात पुणेकरांची पसंत वसंत मोरे ठरु शकले नाही.

### पुणे

| फेरी | महायुती — मुरलीधर मोहोळ | मविआ — रवींद्र धंगेकर |
|---|---|---|
| पहिली फेरी | २९३६८ | २४८८४ |
| दुसरी फेरी | ५७३०७ | ४४६५३ |
| तिसरी फेरी | ८७१२५ | ६८१३२ |
| चौथी फेरी | ११५२२२ | ८९४०६ |
| पाचवी फेरी | १४५७५३ | ११९८२१ |
| सहावी फेरी | १७३२०७ | १३६१२९ |
| सातवी फेरी | २०३०४५ | १५९२६३ |
| आठवी फेरी | २२६९१५ | १८२४२० |
| नववी फेरी | २५९११८ | २०४२९९ |
| दहावी फेरी | २८७२८० | २२८६२१ |
| अकरावी फेरी | २८७२८० | २२८६२१ |



मुरलीधर मोहोळ यांचा विजय म्हणजे गतिमान विकासाचा विजय. महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांची एकजुट या विजयाचे खरे गमक आहे. मुरलीधर मोहोळ म्हणजे स्वच्छ चारित्र्याचा एक मृदु भाषिक खासदार पुण्याला लाभला आहे. पुण्याच्या विकासात आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात मोठी भर घालण्याची सर्व पुणेकरांची अपेक्षा मुरलीधर मोहोळ नक्कीच पुर्ण करतील..
— ॲड मंदार जोशी
महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

### दिवसभर वर्दळ विरळच

नेहमी गर्दीने गजबजणारी दुकाने, हॉटेल्स आणि मॉल्समध्ये मंगळवारी मात्र कमालीची शांतता पाहायला मिळाली. मंगळवारी पुणेकरांचे लक्ष लोकसभेच्या निकालाकडे असल्याने कामाव्यतिरिक्त घराबाहेर पडणाऱ्यांचे प्रमाण फार कमी होते. त्यामुळे शहरातील महत्त्वाचे चौक आणि रस्त्यांवर शुकशुकाट होता.

## ओडिसा विधानसभेत भाजपचा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ओडिसा विधानसभेत भाजपने १४७ पैकी ७५ जागांवर आघाडीवर आहे. भाजप आणि सत्ताधारी बिजू जनता दल यांच्यातच येथे लढत होती. सत्ताधारी बीजेडी ५४ जागांवर आघाडीवर होती. शनिवारी जाहीर झालेल्या एक्झिट पोलनी भाजप सरकार स्थापन करेल, असेच संकेत दिले होते.

२०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत बीजेडीने १४७ जागांपैकी ११७ जागा जिंकून सरकार स्थापन केले होते. भाजपने २३ तर काँग्रेसने ९ जागा जिंकल्या होत्या. नवीन पटनायक सलग पाचव्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले होते.

### आंध्र प्रदेश टीडीपीकडे

आंध्र प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुकीत रालोआच्या टीडीपीने घवघवीत यश मिळवले. चंद्राबाबू नायडू ९ तारखेला मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. येथे विधानसभेच्या १७५ जागांपैकी १३४ जागांवर टीडीपी तर भाजप ८ जागांवर आघाडीवर होते. वायएसआर काँग्रेसचा मोठा पराभव झाला. अभिनेता पवन कल्याण यांच्या नेतृत्वाखालील जनसेना पक्ष २१ जागांवर आघाडीवर होता.



# ऐतिहासिक, विक्रमी विजयाकडे

## भाजप तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जगभराचे लक्ष लागलेल्या अठराव्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआने स्पष्ट बहुमत मिळवले असून, देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणारे पंतप्रधान असा बहुमान नरेंद्र मोदी यांना मिळणार आहे. भाजपची ही कामगिरी ऐतिहासिक तसेच विक्रमी असून, बिगर काँग्रेसी सरकार सलग तिसऱ्यांदा देशाची सूत्रे हाती घेणार आहे. दुसरीकडे, काँग्रेसनेही आपल्या कामगिरीत सुधारणा करत, गेल्या वेळेच्या तुलनेत लक्षणीय यश मिळवले आहे. एक्झिट पोलमधून रालोआ ३६० जागांवर विजय मिळवेल, असा व्यक्त करण्यात आलेला अंदाज निकालांनी खोटा ठरवला आहे.

संध्याकाळी उशिरा जाहीर झालेल्या निकालांनुसार, रालोआ २९२ जागांवर आघाडीवर आहे. बहुमतासाठी २७२ जागांची आवश्यकता आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून, त्याला २४० जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेसने गेल्या वेळी मिळालेल्या ५२ जागांच्या तुलनेत ९९ जागा मिळवत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्षाने अनपेक्षित यश मिळवले असून, तो ३७ जागांवर आघाडीवर होता. अशीच कामगिरी तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालमध्ये करत २९ जागा नावावर केल्या आहेत. हिंदू-मुस्लिम असे झालेले ध्रुवीकरण भाजपच्या जागा कमी करणारे ठरल्याचे निकालांनी स्पष्ट केले आहे.

भाजपला उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रात अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्याचवेळी मध्य प्रदेशमधील सर्वच्या सर्व जागांवर भाजप विजयी होताना दिसत आहे. अरुणाचल प्रदेशच्या २, त्रिपुराच्या २, हिमाचल प्रदेशच्या ४, उत्तराखंडच्या ५ आणि राजधानी दिल्लीच्या ७ जागांवर भाजप आघाडीवर आहे. भाजप ५ राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ४९ जागांवर एकतर्फी विजय मिळवत असल्याचे दिसून येते. गुजरातमध्ये भाजपला २५ जागांवर आघाडी असून, तेथे काँग्रेस एका जागेवर आघाडीवर आहे.

मंगळवारी झालेल्या मतमोजणीच्या ताज्या कलानुसार, हिंदी भाषिक राज्यांमध्ये विरोधकांच्या इंडिया आघाडीने चांगले यश मिळवल्याचे दिसून आले. उत्तर प्रदेशमधील ८० पैकी केवळ ३३ जागांवर भाजपला मिळाल्या. काँग्रेस तेथे ७ जागांवर पुढे होती. उत्तर प्रदेशमध्ये भाजपला २०१४ च्या निवडणुकीत ७१, तर २०१९ मध्ये ६२ जागा मिळाल्या होत्या. आघाडीने येथे भाजपला रोखल्याचे दिसून आले. राजस्थान, बिहार, हरियाणामध्ये आघाडीच्या जागांमध्ये वाढ झाली. मात्र, मध्य प्रदेश, दिल्ली, उत्तराखंड, छत्तीसगडमध्ये आघाडीला यश मिळाले नाही.

### टीडीपी आणि जेडीयूला महत्त्व

● रालोआला बहुमत मिळाले असले, तरी भाजपला २४० ते २५० जागा मिळतील, असे कल आहेत. त्यामुळे सरकार स्थापन करण्यासाठी भाजप सहयोगी पक्षांवर अवलंबून राहील. यात टीडीपी आणि जेडीयू (३०-३२) यांची महत्त्वाची भूमिका राहील. बहुमतासाठी २७२ जागांचा आकडा आवश्यक असून, भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी बहुमतासाठीचे संख्याबळ कमी आहे. त्याचवेळी अनेक राज्यांत भाजपने रालोआने विरोधकांवर एकतर्फी विजय मिळवल्याचे दिसून येते.

## पक्ष फोडाफोडी जनतेला रुचली नाही

# शिंदे-पवारांच्या प्रवेशाने भाजप बॅकफूटवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांना सोबत घेण्याचा निर्णय महाराष्ट्रात भाजपला महागात पडला, असे महाराष्ट्रातील निकालांनी स्पष्ट केले. भाजप-शिवसेना युती ही नैसर्गिक युती होती. तथापि, राष्ट्रवादीच्या अजित पवारांना सोबत घेतल्याने, भाजप सत्तेसाठी कोणत्याही तडजोडी करत असल्याचा चुकीचा संदेश मतदारांपर्यंत गेला.



भाजपचा पारंपारिक मतदारही त्यामुळे पक्षापासून दुरावल्याचे दिसून आले.

एकनाथ शिंदे यांनी केलेले बंड हे जनादेशाचा आदर करण्यासाठी होते, असा दावा करण्यात आला होता. त्यानंतर भाजप-शिवसेना युती राज्यात सत्तेवर आली. मविआ आघाडीचे सरकार उलथून टाकण्याचे काम शिंदे यांच्या बंडाने केले. पक्षांतर बंदी कायद्यापासून बचाव होण्यासाठी त्यांनी शिवसेना पक्षच आपला असल्याचा दावा केला. त्यांचे अनुकरण करत अजित पवारांनी राष्ट्रवादी भाजपच्या दावणीला बांधली. मात्र, अजित पवार भाजपसोबत सत्तेत सहभागी झाल्याने, या निर्णयाचे समर्थन करणे, कट्टर भाजप कार्यकर्त्यांनाही अवघड ठरले. ज्या अजित पवारांच्या भ्रष्टाचाराचे गाडाभर पुरावे आपल्याकडे आहेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारातून सांगितले होते, त्या पवारांना सोबत घेतल्याने चुकीचा संदेश मतदारांना गेला.



प्रचारात पक्ष चोरला, चिन्ह चोरले यावर उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गटाने जोर दिला. सामान्य जनतेपर्यंत हाच संदेश दिला गेला. भाजपला याचे समर्थन करताच आले नाही. पार्टी विथ डिफरन्स असा ज्या भाजपचा लौकिक होता, त्या भाजपमध्ये आणि इतर पक्षांमध्ये काहीही फरक राहिला नाही, अशीच जनसामान्यांची भावना होती. मंगळवारच्या निकालांमध्ये हीच भावना ठळकपणे दिसून येते.

#रा

Sinhgad Technical Education Society's
**SMT. KASHIBAI NAVALE MEDICAL COLLEGE & GENERAL HOSPITAL**
Sinhgad Institutes www.sinhgad.edu
Medical Campus Narhe, Off Westerly Bypass Road, Pune - 411041
Phone: 020 - 67537271 | Email: dean@sknmcgh.org
(Approved by NMC; Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

**WANTED**

Applications are invited from the eligible candidates for the following post in Sinhgad Technical Education Society's Smt. Kashibai Navale Medical College and General Hospital, Narhe (Ambegaon Bk.), Off Westerly Bypass Road, Pune - 411041.

| Sr. No. | Subject | Professor | Associate Professor | Assistant Professor |
|---|---|---|---|---|
| 1 | Pathology | 1 (Open) | — | — |
| 2 | Anaesthesiology | 1 (Open) | — | — |

**A) Qualifications & Experience:** As per National Medical Commission (NMC) Gazette No. CG-DL-E-23022022-233681, dated 14/02/2022 for the above post.

**B) General Notes : 1)** Age Limit & Educational Qualifications shall be considered up-to last date of the application & experience shall be considered up-to earlier day of the interview. **2)** The decision taken by MUHS authorities regarding essential qualifications and experience shall be applicable, from time to time. **3)** Qualified teachers above the age of 64 years will be considered for appointment for one year, as per respective Council's norms. **4)** Pay Scale is as per rules. **5)** Application along with attested copies of all relevant certificates must reach to the college within 15 days from the date of advertisement. The date of interview will be communicated later to the applicants. **6)** This Advertisement is approved subject to orders issued vide GR.- मआविवि–मेडी./353/2019 दि. 20/06/2019.

**C) How to Apply:** Apply to The Dean, Smt. Kashibai Navale Medical College and General Hospital, Sr. No. 49/1, Narhe (Ambegaon Bk.), Off Westerly Bypass Road, Pune - 411041. **Email:** dean@sknmcgh.org, **Phone:** 020 - 67537271.

* Subject to Pune Jurisdiction Only
Dr. (Mrs.) Sunanda M. Navale
Founder Secretary

राष्ट्रसंचार
बुधवार, ५ जून २०२४
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar

# लोकशाहीचा उत्सव

## ४८ जागांचा निकाल

**महाराष्ट्रात ४८ जागांसाठी निकाल** भारतभर महाराष्ट्र राज्याच्या निकालाची कमालीची उत्सुकता होती, कारण गेली दोन वर्ष झालेले राजकीय भुंकूप आणि त्यानंतर झालेली पक्षांची खिचडी त्यामुळे या निकालानंतर **कोण असली आणि कोण नकली हे आता तुम्हीच ठरवा... जय महाराष्ट्र**

कल आणि निकाल ७.३० पर्यंत

### १ नंदूरबार
- गोपाल पाडवी ०५,०१,७६० — विजयी
- मताधिक्य 1 लाख 41 हजार 992
- डॉ. हिना गावित (पराभूत)

### २ धुळे
- बच्छाव शोभा दिनेश ५८२१४९ — विजयी
- मताधिक्य: ५१५५
- पराभूत उमेदवार: भामरे सुभाष रामराव

### ३ जळगाव
- स्मिता वाघ १,६४,५३१ — विजयी
- मताधिक्य : ८६,३८१
- पराभूत उमेदवार: करण पवार

### ४ रावेर
- रक्षा खडसे ६२७६७२ — विजयी
- मताधिक्य २७१०४८
- पराभूत उमेदवार: श्रीराम दयाराम पाटील

### ५ बुलडाणा
- प्रतापराव जाधव ३४९८६७ — विजयी
- मताधिक्य २९४७९
- पराभूत उमेदवार: नरेंद्र खेडेकर,रविकांत तुपकर

### ६ अकोला
- अनुप संजय धोत्रे 457030 — विजयी
- मताधिक्य : 40626
- पराभूत उमेदवार: अभय काशिनाथ पाटील

### ७ अमरावती
- बळवंत वानखेडे ५२६२७१ — विजयी
- मताधिक्य १९७३१
- पराभूत उमेदवार: नवनीत राणा

### ८ वर्धा
- अमर शरदराव काळे ३७२४९९ — विजयी
- मताधिक्य ४४७०८
- पराभूत उमेदवार: रामदास चंद्रभान तडस

### ९ नागपूर
- नितीन गडकरी ६,५५,०२७ — विजयी
- मताधिक्य ०१,३७,६०३
- पराभूत उमेदवार: विकास ठाकरे

### १० रामटेक
- श्यामकुमार (बाबालू) दौलत बर्वे ५६५०४८ — विजयी
- मताधिक्य ७५९३४
- पराभूत उमेदवार: राजू पारवे

### ११ भंडारा-गोंदीया
- डॉ. प्रशांत यादराव पडोळे ५०६४१५ — विजयी
- मताधिक्य २९१६३
- पराभूत उमेदवार: सुनील बाबुराव मेंढे

### १२ गडचिरोली-चिमूर
- डॉ. किरसन नामदेव 614610 — विजयी
- मताधिक्य 140234
- पराभूत उमेदवार: अशोक महादेवराव नेटे

### १३ चंद्रपूर
- प्रतिभा धनोरकर ७०४२०८ — विजयी
- मताधिक्य २५३३५६
- पराभूत उमेदवार: सुधीर मुनगंट्टीवार

### १४ यवतमाळ-वाशिम
- संजय देशमुख ५९१८९९ — विजयी
- मताधिक्य ९३३८५
- पराभूत उमेदवार: राजश्रीताई हेमंत पाटील

### १५ हिंगोली
- आष्टीकर पाटील नागेश बापूराव ४८०२११ — विजयी
- मताधिक्य १०४८८७
- पराभूत उमेदवार: बाबुराव कदम कोहळीकर

### १६ नांदेड
- बळवंतराव चव्हाण ४३३३१२ — विजयी
- मताधिक्य २४४५५
- पराभूत उमेदवार: गोविंदराव चिखलीकर

### १७ परभणी
- जाधव संजय (बंडू) हरिभाऊ ४३२२२१ — विजयी
- मताधिक्य १२०५८०
- पराभूत उमेदवार: महादेव जानकर


### १८ जालना
- कल्याण वैजिनाथराव काळे ४८८१३७ — विजयी
- मताधिक्य ७०१२७
- पराभूत उमेदवार: रावसाहेब दानवे

### १९ छ. संभाजीनगर
- भुमरे संदिपनराव आसाराम ४३६९८२ — विजयी
- मताधिक्य १२१३३७
- पराभूत उमेदवार:इम्तियाज जलील सय्यद

### २० दिंडोरी
- भास्कर मुरलीधर भगरे ५७७३३९ — विजयी
- मताधिक्य ११३१९९
- पराभूत उमेदवार: डॉ. भारती प्रवीण पवार

### २१ नाशिक
- राजाभाऊ वाजे ०१,८१,७६३ — विजयी
- मताधिक्य ३८,३०१
- पराभूत उमेदवार: हेमंत गोडसे

## महाराष्ट्र राज्य निकाल एकूण जागा ४८




काही नेत्यांना वाटतं की नवीन पिढीला नेता बनण्याची घाई झाली आहे ; पण त्यांना सांगायचंय की, नेता बनण्याची घाई नाही तर सध्या ज्या खालच्या पातळीला राजकारण गेलं त्याचा स्तर सुधारण्याची मात्र नक्कीच घाई झालीय! बारामतीत सुप्रियाताईंचा विजय हा आदरणीय पवार साहेबांच्या विचारांचा, सुप्रियाताईंच्या कष्टाचा, मविआ चे सर्व पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ते यांच्या त्यागाचा आणि दडपशाहीला झुगारलेल्या स्वाभिमानी सामान्य जनतेच्या प्रेमाचा आहे

- रोहित पवार

**१९ महायुती**

**२८ आघाडी**

**०१ इतर**

### २२ पालघर
- डॉ.हेमंत सावरा ०४,९३,६६७ — विजयी
- मताधिक्य १४७३००
- पराभूत उमेदवार: भारती कामदी

### २३ भिवंडी
- सुरेश गोपीनाथ म्हात्रे ४५३४२१ — विजयी
- मताधिक्य ८४३५८
- पराभूत उमेदवार: कपिल पाटील

### २४ कल्याण
- श्रीकांत शिंदे ०५,८९,६३६ — विजयी
- मताधिक्य : ०२,०९१,४४
- पराभूत उमेदवार: वैशाली दरेकर

### २५ ठाणे
- नरेश म्हस्के ७२१९४७ — विजयी
- मताधिक्य २१३९०४
- पराभूत उमेदवार: राजन विचारे

### २६ उत्तर मुंबई
- पियुष गोयल 03,37,415 — विजयी
- मताधिक्य- १ लाख ७१ हजार 314
- पराभूत उमेदवार -भूषण पाटील

### २७ मुंबई उत्तर-पुर्व
- रवींद्र दत्ताराम वायकर ४४३४७८ — विजयी
- मताधिक्क्य : ७५
- पराभूत उमेदवार : अमोल किर्तीकर

### २८ मुंबई उत्तर-पुर्व
- संजय दीना पाटील ४५०९३७ — विजयी
- मताधिक्क्य : २९८६१
- पराभूत उमेदवार : मिहीर कोटेचा

### २९ मुंबई उत्तर-मध्य
- वर्षा गायकवाड ४४०३०३ — विजयी
- मताधिक्य १६२३१
- पराभूत उमेदवार: ॲड. उज्वल निकम

### ३० मुंबई दक्षिण-मध्य
- अनिल देसाई ३७८९४८ — विजयी
- मताधिक्य: ५२,४३६
- पराभूत उमेदरार: राहुल शेवाळे

### ३१ मुंबई दक्षिण
- अरविंद सावंत ३९१६२३ — विजयी
- मताधिक्य ५२३०१
- पराभूत उमेदवार: यामिनी जाधव

### ३२ रायगड
- सुनील तटकरे ५०८३५२ — विजयी
- मताधिक्य ८२७८४
- पराभूत उमेदवार: अनंत गीते

### ३३ मावळ
- श्रीरंग बारणे 2,99,161 — विजयी
- मताधिक्य : 45,000
- पराभूत उमेदवार : संजोग वाघेरे

### ३४ पुणे
- मुरलीधर मोहोळ ५४१४८३ — विजयी
- मताधिक्य :११२६४२
- पराभूत उमेदवार: रविंद्र धंगेकर

### ३५ बारामती
- सुप्रिया सुळे ५,५९,६४५ — विजयी
- मताधिक्य - ०१,५३,०४८,
- पराभूत उमेदवार : सुनेत्रा पवार

### ३६ शिरुर
- डॉ. अमोल कोल्हे ६९९६६२ — विजयी
- मताधिक्य १२२८३९
- पराभूत उमेदवार: शिवाजी आढळराव

### ३७ अहमदनगर
- निलेश लंके ३८७४३७ — विजयी
- मताधिक्य ६०,०००
- पराभूत उमेदवार: सुजय विखे पाटील

### ३८ शिर्डी
- भाऊसाहेब वाघचौरे १,१२,६५३ — विजयी
- मताधिक्यः ३६,००,००
- पराभूत उमेदवार : सदाशिव लोखंडे

### ३९ बीड
- बजरंग सोनवणे ५३०६९८ — विजयी
- मताधिक्य २२६०७
- पराभूत उमेदवार: बजरंग सोनवणे

### ४० धाराशीव
- ओमराजे निंबाळकर ६,०६,१८३ — विजयी
- मताधिक्य २ लाख
- पराभूत उमेदवार: अर्चना पाटील

### ४१ लातूर
- शिवाजीराव काळगे ०६,०३६२९ — विजयी
- मताधिक्य ६२९८७
- पराभूत उमेदवार: तुकाराम श्रंगारे

### ४२ सोलापूर
- प्रणिती शिंदे ४३३३९२ — विजयी
- मताधिक्य : ८१५२४
- पराभूत उमेदवार: राम सातपुते

### ४३ माढा
- धैर्यशील मोहिते-पाटील ४,६५,०११ — विजयी
- मताधिक्य ः ५१०९२१
- पराभूत उमेदवार: रणजीतसिंह निंबाळकर

### ४४ सांगली
- विशाल पाटील (अपक्ष) ०४,२९,९४७ — विजयी
- मताधिक्य : ८०,०००
- संजयकाका पाटील - चंद्रहार पाटील (पराभूत)

### ४५ सातारा
- उमेदवाराचे नाव भाजप ०५,४८,९०३ — विजयी
- मताधिक्य ८७ हजार ७१७
- पराभूत उमेदवार: शशिकांत शिंदे

### ४६ रत्नागिरी-सिंधुदुर्ग
- नारायण राणे ४३९८३१ — विजयी
- मताधिक्य ४९५७८
- पराभूत उमेदवार: विनायक राऊत

### ४७ कोल्हापूर
- शाहू महाराज ०३, ०७,१८१ — विजयी
- मताधिक्य : ७०, ०००
- पराभूत उमेदवार: संजय मंडलिक

### ४८ हातकणंगले
- धैर्यशील माने ४६६५९३ — विजयी
- मताधिक्य : १७८८५
- पराभूत उमेदवार: सत्यजीत पाटील, राजू शेट्टी

मावळ लोकसभा मतदारसंघात लाखोंच्या फरकाने निवडून येणार हे आधीच सांगितलं होतं. माझ्यावर मतदारांनी विश्वास ठेवून कौल दिला आहे. महायुती आणि कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. पिंपरी- चिंचवड शहरातील जनतेने माझ्यावर विश्वास टाकला. महाराष्ट्रातील चित्र वेगळं असताना मला लाखो ची लीड मिळाली आहे. विजयाचे श्रेय महायुतीच्या कार्यकर्त्यांना, मी मनापासून आभार. — श्रीरंग बारणे, मावळ


संसदरत्न आदरणीय
सुप्रियाताई सुळे
यांच्या ऐतिहासिक आणि अपेक्षित विजयाबद्दल मतदारांचे
मनापासून आभार आणि ताईंचे अभिनंदन !
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार
शुभेच्छुक : रेवती एंटरप्राईजेस ,
पुणे | बारामती | मावळ

पॉलिटिकल guarantee

विकसित भारताचा पाया रचणाऱ्या महाविजयाची हमी!!!

» News मार्टम नाशिक जिल्ह्याचे राजकारण दिग्गजांच्या सभांमुळे तापणार

# अंतिम निकाल

उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान अशा काही राज्यांमध्ये मिळालेल्या मर्यादित यशामुळे भाजप व रालोआचे चारशे पारचे स्वप्न अधुरे राहिले असले तरी पक्षाच्या दीर्घकालीन राजकारणाच्या दृष्टीने काही अनुकूल बाबीदेखील घडल्या आहेत. ओडिशावर एकहाती सत्ता गाजवणाऱ्या बिजू जनता दलाची सद्दी भाजपने संपवली आहे. तीच स्थिती दक्षिणेतील आंध्र प्रदेशचीही आहे. तेलगू देसम या जुन्या मित्राला सोबत घेत भाजपने ते राज्य पादाक्रांत केले आहे. पक्षाचा संपूर्ण देशभर विस्तार करण्यासाठी हे सहाय्यभूत ठरणार आहे.

**२८** राज्ये

**०८** केंद्र शासित राज्ये

**५४३** एकूण जागा

## • लोकशाहीचा उत्सव प्रतिक्रिया......

### » इतिहासातील अभूतपूर्व क्षण



देशाच्या नागरिकांनी एनडीएवर सतत तिसऱ्यांदा विश्वास दाखवला. भारताच्या इतिहासातला हा ऐतिहासिक विजयाचा क्षण आहे. मी या स्नेह आणि आशीर्वादासाठी आपल्या कुटुंबासमोर नतमस्तर होतो. मी देशातील नागरिकांना शब्द देतो की त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आम्ही नेहमी नवी ऊर्जा, नवीन संकल्पाना घेऊन पुढे येऊ."

देशाच्या जनता-जनार्दनानं एनडीएवर सातत्यानं तिसऱ्यांदा विश्वास दाखवला आहे. भारताच्या इतिहासातील हा अभूतपूर्व क्षण आहे. मी या प्रेम आणि आशीर्वादासाठी माझ्या कुटुंबियाना नमन करतो.मी देशवासियांना विश्वास देऊ इच्छितो की त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही नवी उर्जा, नवी उमंग आणि नव्या संकल्पांसह पुढे जाणार आहोत.सर्व कार्यकर्त्यांनी ज्या समर्पन भावनेनं अथक मेहनत केली आहे. मी यासाठी सर्वांचं मनापासून आभार मानतो. अभिनंदन करतो."

— **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### » जनादेश नरेंद्र मोदींच्या विरोधात



लोकसभा निवडणुकीची मतमोजणी अद्याप सुरु आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालात स्वबळावर सत्ता मिळवण्याचं भाजपचं स्वप्न भंगलं आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसनं पत्रकार परिषद घेतली. मल्लिकार्जून खरगे आणि राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केल. काँग्रेसनं 2019 च्या लोकसभा निवडणुकीतील कामगिरी पेक्षा चांगलं प्रदर्शन यावेळीकेलं आहे. मल्लिकार्जून खरगे यांनी ही निवडणूक मोदी विरुद्ध जनता अशी झाल्याचं म्हटलं. हा निकाल जनतेचा निकाल आहे. हा जनतेचा विजय असून लोकशाहीचा विजय असल्याचं मल्लिकार्जून खरगे यांनी म्हटलं. ही निवडणूक जनता विरुद्ध मोदी अशी आहे, असं आम्ही सांगत आलेलो आहे. आम्ही विनम्रपणे निवडणुकीचा कौल स्वीकारत आहोत. जनतेनं यावेळी एका कुणालाही बहुमत दिलं नाही. हा जनादेश नरेंद्र मोदींच्या विरोधात गेल्याचं खरगे म्हणाले. आपल्या नावानं जो व्यक्ती मतं मागत होता, त्यांचा हा मोठा पराभव आहे. - "

— **मल्लिकार्जून खरगे,** काँग्रेस अध्यक्ष

### ही लढाई संविधान वाचवण्याची «



आम्ही आधी सांगितल्याप्रमाणे आम्ही आमच्या इंडिया आघाडीमधील सहकाऱ्यासोबत बैठक घेणार आहोत. ही बैठक उद्या होईल आणि या प्रश्नाचे उत्तर त्या बैठकीत दिले जाईल. आम्ही आमच्या घटक पक्षांचा आदर करतो, त्यामुळे त्यांची मते घेतल्याशिवाय आम्ही कोणतीही घोषणा करणार नाही असेही राहुल गांधी म्हणाले. पुढील निर्णय उद्या इंडिया आघाडीची बैठकीत होईल. आम्ही एका आघाडीचा भाग आहोत, इतर पक्षांसोबत आमची चर्चा झालेली नाहीये. निकालानंतर पाच तारखेला आमची बैठक होईल असं ठरलं आहे. त्या बैठकीत आम्ही विरोधात बसणार की सत्तास्थापनेचा प्रयत्न करणार हे ठरवू असे पुन्हा राहुल गांधी यांनी स्पष्ट केलं. "

— **राहुल गांधी,** काँग्रेस नेते

### » ररररररररररररररररर



नरेंद्र मोदी यांनी नैतिकतेच्या आधारे तातडीने राजीनामा दिला पाहिजे आणि अटल वाजपेयींच्या कॅबिनेटमध्ये असणाऱ्या व्यक्तीला पंतप्रधान बनवायला हवं. पंतप्रधान मोदी ४०० पारची घोषणा देत होते. परंतु भाजपाला स्वबळावरही बहुमत मिळालं नाही. त्यामुळे त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देणं ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. इंडिया आघाडीला संधी मिळायला हवी असंही त्यांनी म्हटलं. देशातील घटक पक्षांनी देश आणि संविधानाच्या रक्षणासाठी इंडिया आघाडीसोबत यावं."

— **ममता बॅनर्जी,** मुख्यमंत्री, प. बंगाल

अठराव्या लोकसभेत भाजप आपल्या मित्रपक्षांसह २९१ या तगड्या संख्याबळाने प्रवेश करणार आहे. आघाडीच्या राजकारणाचा नवा अध्याय यामुळे लिहिला जाणार आहे. तरीही हे खिचडी सरकार मात्र नसणार आहे. एरवी आघाड्यांच्या सत्तास्थापनेत तोडीस तोड असलेले पक्ष एकत्र आलेले असतात; परंतु रालोआत मात्र नियंत्रण भाजपकडेच राहणार आहे. नंतरच्या क्रमांकांवर असलेले पक्ष जेमतेम विशीदेखील गाठू शकलेले नाहीत. त्यामुळे देशाला अस्थिरतेचा सामना करावा लागणार नाही, असे राजकीय निरिक्षकांचे मत आहे.




### जम्मू कश्मीर — ५ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०२ | ०२ | ०१ |

### हिमाचल प्रदेश — ४ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०४ | ०० | ०० |

### उत्तराखंड — ५ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०५ | ०० | ०० |

### बिहार — ४० एकूण जागा

| भाजप | जेडीयू | राजद | एलजेपीआरवी | काँग्रेस | एचएएमएस |
|---|---|---|---|---|---|
| १२ | १२ | ०४ | ५ | ३ | १ |

### आसाम — १४ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस | यूपीपीएल | एजीपी |
|---|---|---|---|
| ०९ | ०३ | ०१ | ०१ |

### अरुणाचल प्रदेश — २ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०२ | ०० | ०० |

### सिक्कीम — १ एकूण जागा

| एसकेएम | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०१ | ०० | ०० |

### हरियाणा — १० एकूण जागा


| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०५ | ०५ | ०० |

### पंजाब — 09 एकूण जागा

| आप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०३ | ०७ | ०२ |

### उत्तर प्रदेश — ८० एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | एसपी | आरएलडी | एएसपीकेआर | एडीएएल |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | ०६ | ३७ | ०२ | ०१ | ०१ |



### राजस्थान — २५ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस | आरटीपी | आरटीपी |
|---|---|---|---|
| १४ | ०८ | ०१ | ०१ |

### मनिपूर — २ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०० | ०२ | ०० |

### नागालँड — १ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०० | ०१ | ०० |

### मिझोराम — १ एकूण जागा

| भाजप | झेडपीएम | इतर |
|---|---|---|
| ०० | ०१ | ०० |

### त्रिपुरा — २ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०२ | ०० | ०० |

### गुजरात — २६ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| २५ | ०१ | ०० |

### महाराष्ट्र — ४८ एकूण जागा

| एनसीपीएसपी | भाजप | एसएचएस | काँग्रेस | राष्ट्रवादी | SHSUBT |
|---|---|---|---|---|---|
| ०७ | १० | ०७ | १३ | ०१ | 09 |

### पश्चिम बंगाल — ४२ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | एआयसीटी |
|---|---|---|
| १२ | ०१ | २९ |

### मध्य प्रदेश — २९ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| 29 | 00 | 00 |

### झारखंड — १४ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | जेएमएम | एजेएसयूपी |
|---|---|---|---|
| ०८ | ०२ | ०३ | ०१ |

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

### गोवा — २ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०१ | 01 | ०० |

### कर्नाटक — २८ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | अन्य |
|---|---|---|
| १७ | ०९ | ०२ |

### तेलंगणा — १७ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| २९ | ०० | ०० |

### ओरिसा — २१ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| १९ | ०१ | ०१ |



### केरळ — २० एकूण जागा

| केईसी | भाजप | काँग्रेस | आयूएमएल | आरएसपी |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ | १४ | ०२ | ०१ |

### तमिळनाडू — ३९ एकूण जागा

| आरएसपी | काँग्रेस | सीपीआय(एम) | सीपीआय | एमडीएमके |
|---|---|---|---|---|
| २२ | ९ | २ | २ | १ |

### आंध्र प्रदेश — २५ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| ०३ | १६ | ४ |

### छत्तीसगड — ११ एकूण जागा

| भाजप | काँग्रेस (इं. आ.) | इतर |
|---|---|---|
| १० | ०१ | ०० |



RS पॉलिटिकल guarantee

## वाराणसीतून नरेंद्र मोदींची विजयी हॅटट्रिक



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणूक 2024 चे निकाल जाहीर होत आहेत. हे निकाल भाजप अथवा एनडीएच्या अपेक्षेप्रमाणे नसले तरी, गुजरातच्या गांधीनगर मतदारसंघात अमित शाह यांनी कमाल केली आहे. येथून अमित शाह तब्बल ७,४४,७१६ मतांनी विजयी झाले आहेत. विशेष म्हणजे या विजयासह त्यांनी स्वतःच स्वतःच्या विजयाचा विक्रम मोडला आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत अमित शाह यांनी 5 लाख मतांनी विजय नोंदवला होता. यापूर्वी गांधीनगरमधून आडवाणी यांनी 4.83 लाख मतांनी विजय मिळवला होता. तसेच दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी लोकसभा मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. गुजरातमधील गांधीनगर मतदारसंघ हा गेल्या 35 वर्षांपासून भाजपचा बालेकिल्ला आहे. अमित शह यांच्याआधी ही जागा भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्याकडे होती. ही जागा भाजपची अत्यंत सुरक्षित जागा मानली जाते. अडवाणींनी या जागेवरून तब्बल ६ वेळा निवडून आले आहेत. तर अमित शाह 2019 पासून या जागेवरून निवडणूक लढवत आहेत आणि त्यांनी गांधीनगरमधून दुसऱ्यांदा दणदणीत विजय मिळवला आहे. या निवडणुकीत अमित शाह यांना एकूण 1010972 मते मिळाली आहेत. त्यांनी काँग्रेसच्या सोनल पटेल यांचा पराभव केला. त्यांना केवळ २६६२५६ मते मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी लोकसभा मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. त्यांनी काँग्रेसचे उमेदवार अजय राय यांचा पराभव केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 6 लाख 12 हजार 970 मते मिळाली आहेत. तर काँग्रेसचे उमेदवार अजय राय यांना 4 लाख 60 हजार 457 मते मिळाली आहेत. पंतप्रधान मोदी यांनी वाराणसीमधून 1 लाख 52 हजार 513 मतांनी विजय नोंदवला आहे. यापूर्वी, मोदी 2014 आणि 2019 मध्येही वाराणसीतून विजयी होत लोकसभेत पोहोचले होते. याच बरोबर, ते एकाच जागेवरून सलग तिसऱ्यांदा विजयी होणारे तिसरे पंतप्रधान ठरले आहेत. यापूर्वी हा विक्रम देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावावर होता. नेहरू फूलपूर लोकसभा मतदारसंघातून तीनवेळा खासदार झाले होते. तर अटल बिहारी वाजपैयी हे लखनौ लोकसभा मतदारसंघातून पाचवेळा विजयी झाले होते.

## भाजपला धूळ चारत अखिलेश १२ वर्षांनंतर लोकसभेत



**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री होण्यापूर्वी कन्नौज मतदारसंघातून अखिलेश यादव यांनी येथे विजयाची हॅट्रीक केली आहे. आता अखिलेश तब्बल १२ वर्षांनंतर या जागेवर पुन्हा निवडणूक लढवली होती. त्यामुळे भाजपसमोर आव्हान निर्माण झाले होते. दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार अखिलेश यांनी कन्नौजमधून बाजी मारली असून, त्यांनी 1 लाख 21 हजार मतांनी विजय मिळवला आहे.सपाने पीडीएचा (मागास, दलित आणि अल्पसंख्याक) नारा दिला आहे. मात्र, येथील विजयाचा आधार नेहमीच माय (मुस्लिम आणि यादव) राहिला आहे. गेल्या तीन लोकसभा निवडणुकांपासून भाजपने येथे सुब्रत पाठक यांना उमेदवारी दिली आहे. 2014 मध्ये सुब्रत पाठक येथून पहिल्यांदा लढले होते. तेव्हा डिंपल यादव यांनी त्यांचा पराभव केला होता. तर 2019 पाठक यांनी डिंपल यादव यांना धूळ चारली होती.

उत्तर प्रदेशातील कन्नौज लोकसभा जागा 1967 मध्ये अस्तित्वात आली. 1967 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत युनायटेड सोशालिस्ट पार्टीचे राम मनोहर लोहिया यांनी ही जागा जिंकली होती. शीला दीक्षित, अखिलेश यादव, डिंपल यादव आणि सुब्रत पाठक यांसारखे चेहरेही येथून निवडणूक जिंकले आहेत.

कन्नौज लोकसभा मतदारसंघात छिब्रामौ, तिरवा, कन्नौज, बिधुना, रसुलाबादसह 5 विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात भाजप, सपा हे प्रमुख पक्ष आहेत.

### मागच्या वेळी कोण जिंकले?

2019 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे सुब्रत पाठक यांनी 12,353 मतांच्या फरकाने ही जागा जिंकली होती. त्यांना 49.00% मतांसह 563,087 मते मिळाली. त्यांनी समाजवादी पक्षाच्या डिंपल यादव यांचा पराभव केला, त्यांना 550,734 मते (48.27%) मिळाली. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत डिंपल यादव यांनी ही जागा जिंकली होती. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत, डिंपल यादव यांना 43.89% मतांसह 489,164 मते मिळाली. भाजपचे उमेदवार सुब्रत पाठक यांना 469,257 मते (42.10%) मिळाली होती. डिंपल यादव यांनी सुब्रत पाठक यांचा १९,९०७ मतांनी पराभव केला होता.

पान १ वरून

## पुण्याचा पैलवान दिल्लीत जाणार

**पुणे :** रापुण्यात लोकसभेसाठी तीन पैलवान मैदानात उतरले होते. काँग्रेसचे रवींद्र धंगेकर, भाजपचे मुरलीधर मोहोळ आणि वंचितचे वसंत मोरे रिंगणात उतरले होते. त्यात कोणता पैलवान बाजी मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यात आता मुरलीधर मोहोळ यांनी मुसंडी मारत डाव आपला करुन घेतल्याचे चित्र स्पष्ट झाले. त्यामुळे पुण्याचा पैलवान आता दिल्लीत जाणार, अशा घोषणा करण्यात येत आहेत.

## कार्यकर्त्यांच्या घोषणांनी दुमदुमला परिसर

पुण्यामध्ये भाजप उमेदवार मुरलीधर मोहोळ आणि काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यात थेट लढत झाली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या लढतीत मोहोळ यांनी बाजी मारल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. तेराव्या फेरी अखेर ६६ हजारांची आघाडी घेत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केला. यानंतर मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष सुरू केला. विजयाचा गुलाल उधळत कार्यालयाच्या नावाजवळ खासदार पाटीही बदलण्यात आली आहे. कोथरूडमधील मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयाबाहेर जोरदार बॅनरबाजी करण्यात आली आहे. मोहोळ यांच्या मयूर कॉलनीमधील कार्यालयासमोर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. कार्यकर्त्यांनी घोषणा देत परिसर दुमदुमून सोडला होता.

# जल्लोषपूर्ण वातावरणात आनंदोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

लोकसभा निवडणूक '२४

**पुणे :** जय श्री रामऽऽ', 'आले रे आले, अण्णा आले,' अशी जोशपूर्ण घोषणाबाजी... भगव्या गुलालाची मुक्त उधळण...डिजेच्या भिंतींचा दणदणाटऽऽ..अन् सोबतीला कार्यकर्त्यांचा अखंड वाहणारा उत्साह अशा जल्लोषपूर्ण वातावरणात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या कोथरूड येथील जनसंपर्क कार्यालय परिसरात मोठ्या दिमाखात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी 'काय म्हणता पुणेकर, कुठे हरवला धंगेकर' या फलकाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.



लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीची शिगेला पोहचलेली उत्सुकता, त्याच उत्सुकतेपोटी शहरातील एकूणच वातावरणात झालेला बदल, एकामागोमाग एक येणारी निकालाची माहिती आणि मतमोजणीच्या सकाळच्या सत्रातच पुणे लोकसभा मतदारसंघातील चित्र स्पष्ट झाले. आणि भाजपच्या हजारो कार्यकर्त्यांनी जल्लोषास दिमाखदार सुरुवात केली. मोहोळ यांच्या कोथरूड येथील जनसंपर्क कार्यालयात दुपारी बारा वाजल्यापासूनच आनंदोत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली. प्रत्येक फेरीत मोहोळ यांचे मताधिक्य वाढताना दिसत असल्याने कार्यकर्त्यांनी भगव्या गुलालाची मनसोक्त उधळण केली. शेकडो किलो भगवा गुलाल यावेळी उधळला गेला. या जनसंपर्क कार्यालयात सकाळी आठ वाजताच कार्यकर्त्यांनी येण्यास सुरुवात केली. उत्तरोत्तर मताधिक्यांत भर पडत असताना कार्यालयात येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या संख्येतही भर पडत होती. एवढंच नव्हे तर कर्वे रस्त्यावर कार्यकर्त्यांनी पक्षाचा झेंडा फडकावीत आनंदोत्सव साजरा केला.

एकीकडे मोहोळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात आनंदोत्सव साजरा होत असताना भाजपच्या पुणे शहर मध्यवर्ती कार्यालयात मात्र शुकशुकाट असल्याचे पाहायला मिळाले. भाजपचे पुणे शहर मध्यवर्ती कार्यालय हे वर्षाच्या सुरुवातीलाच म्हात्रे पुलाजवळील डी. पी. रस्त्यावर स्थलांतरित करण्यात आले आहे. पुणे लोकसभा निवडणुकीतील प्रचाराची रणनीती, नियोजन याच कार्यालयात पार पडले. एवढंच नव्हे, तर भाजपच्या अनेक नेत्यांनी याच कार्यालयातून कार्यकर्ते, पत्रकारांशी संवाद साधला. परंतु, पुण्यात विजयी वाटचाल करत असताना देखील हे कार्यालय मंगळवारी शांत होते. मोजकेच कार्यकर्ते दिवसभर कार्यालयात असल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, संध्याकाळनंतर मध्यवर्ती कार्यालयात विजयोत्सव साजरा करण्यासाठी डिजे, ध्वनिवर्धक, लाईटस्‌ची व्यवस्था मात्र करून ठेवण्यात आली होती.

# जाहीर निकाल निराशा करणारे

**पुणे :** एक्झिट पोलचे अंदाज जाहीर झाल्यानंतर भारतीय शेअर बाजाराने विक्रमी उसळी घेत, त्याचे स्वागत केले होते. मात्र, मंगळवारी जाहीर झालेले कल बाजाराची निराशा करणारे ठरले. म्हणूनच, प्रारंभीच्या सत्रात निर्देशांकात ४,१६५.९१ अंकांची अभूतपूर्व घसरण पहायला मिळाली. निर्देशांक ४,३८९.७३ अंकांनी घसरून ७२,०७९.०५ अंकांवर बंद झाला. निफ्टीतही १,३७९.४० अंकांनी घसरून २१,८८४.५० वर बं द झाला.

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्थिर सरकार स्थापन होणार असल्याचा अंदाज एक्झिट पोलमधून वर्तवण्यात आला होता. गेल्या १० वर्षांत केंद्र सरकारने राबवलेले धोरणात्मक निर्णय आणि सुधारणा पुढील ५ वर्षांतही कायम राहतील, या अपेक्षेने शेअर बाजाराने सकारात्मक प्रतिसाद दिला. मात्र, मंगळवारी मतमोजणीला प्रारंभ झाल्यानंतर, प्रारंभीच्या कलात भाजपच्या रालोआला अनपेक्षितपणे कमी जागा दिसू लागल्याने, त्याचा परिणाम शेअर बाजारावर झाला. भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले नाही, तर केंद्रातील सरकारला राजकीय स्थिरता मिळणार नाही, या शक्यतेने बाजारात या भावनेचे प्रतिबिंब उमटले. मोदी ३.० च्या कार्यकाळात अपेक्षेप्रमाणे सुधारणा दिसून येणार नाहीत, ही भावना असल्याने, नकारात्मक प्रतिसाद मिळाला.

गेल्या १० वर्षांत स्पष्ट बहुमताच्या जोरावर केंद्रातील मोदी सरकारने धोरणात्मक सुधारणांचा धडाका लावला. पायाभूत सुविधांसह भांडवली खर्चासाठी केलेली विक्रमी तरतूद ही अर्थव्यवस्थेला विक्रमी गती देणारी ठरली. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असा लौकिक भारतीय अर्थव्यवस्थेने मिळवला. तसेच २०४७ मधील विकसित भारताची पायाभरणीही केली गेली. पुढील पाच वर्षांत भारताने विकासाचा दर ८ टक्के राखण्यासाठी सुधारणा कायम राहणे अत्यावश्यक आहे. तथापि, भाजपला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने, आता आर्थिक सुधारणा कायम राहणार का, हा काळजीचा विषय आहे. त्याचेच प्रतिबिंब भारतीय बाजारात उमटले.

## निवडक प्रतिक्रिया

### वचनपूर्तीच्या दिशेने...!



लोकसभा निवडणुकीत मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाल्याबद्दल सर्वप्रथम मुरलीधर मोहोळ यांचे मनःपूर्वक अभिनंदन. पुण्याच्या विकासाचे वचन आम्ही दिलेले आहेत, त्या वचनपूर्तीच्या दिशेने लोकसभा निवडणुकीतील हा विजय हे ठाम पाऊल आहे. विकासाला हातभार लावताना जनतेच्या कल्याणासाठी, त्यांचे प्रश्न आग्रहाने सोडवण्यासाठी नवनिर्वाचित खासदार मोहोळ आणि आम्ही सगळेच अविरत कार्यरत राहूच. लोकसभा निवडणुकीत मोहोळ यांच्या प्रचारासाठी अखंड मेहनत घेणारे भाजपा आणि महायुतीचे सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतकांचे आभार. आम्हाला विजय मिळवून देणाऱ्या मतदारांचेही आभार. आपण दाखवलेला विश्वास कायम राखण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील राहू.

**-चंद्रकांत पाटील**

### कसबा हा भाजपचाच; पुन्हा एकदा शिक्कामोर्तब...!



मुरलीधर मोहोळ यांची लढत ही चुरशीची असल्याची हवा निर्माण करण्यात आली होती. परंतु मोहोळ हेच या शहराला न्याय देऊ शकतात याबाबत सर्वसामान्यांच्या मनामध्ये विश्वास होता. आणि त्यांच्या विजयाने सिद्ध झाला. पुणे शहरातील समाजवाहिनी समजल्या जाणाऱ्या सर्व गणेशोत्सव मंडळांनी आणि सामाजिक सेवा संस्थांनी त्यांना सक्रिय पाठिंबा दिला होता. हे सर्व सैन्य त्यांच्या विजयासाठी मनापासून झटले. पुण्यातील सामाजिक वातावरण ढवळून काढत भारतीय जनता पक्ष हाच सामाजिक अभिसरणासाठी कसा योग्य आहे याची ग्वाही सामाजिक मंडळांनी घेतली आणि ती मतदारांना पटवून दिली. म्हणून इतका भव्य दिव्य विजय मोहोळांनी मिळविला कसब्यामध्ये देखील मताधिक्य मिळत असल्यामुळे मागील पोटनिवडणुकीमध्ये विरोधकांचा झालेला विजय हा केवळ अपघात होता हे सिद्ध झाले. कसबा हा भाजपचाच आहे हे पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

**-पुनित बालन**

### गैरसमज दूर केल्याने विजयाची वाटचाल केली...!



मला आधी पासूनच माहित होते की विजय मुरलीधर मोहोळ यांचाच होणार. पण सोशल मीडियाच्या माध्यमातून एक हवा निर्माण केली गेली होती. पण मोहोळांच्या विजयाने अफवेचा फुगा अखेर फुटला. भारतीय जनता पक्षाची जी वोट बँक आहे त्या बँकेची शक्ती वाढल्याने चांगल्या मताधिक्याने आम्ही जिंकलो. दलित समाज आणि मुस्लिम समाजात आम्ही संविधान बदलू हा गैरसमजाने होता. परंतु आम्ही सर्वांना सांभाळून घेऊ, सर्वांची समजूत काढून गैरसमज दूर केल्याने विजयाची वाटचाल केली आहे.

**-संदीप खर्डेकर**

### नेता बनण्याची नाही, तर राजकारण सुधारण्याची घाई



काही नेत्यांना वाटतं की नवीन पिढीला नेता बनण्याची घाई झालीय; पण त्यांना सांगायचंय की, नेता बनण्याची घाई नाही तर सध्या ज्या खालच्या पातळीला राजकारण गेलं त्याचा स्तर सुधारण्याची मात्र नक्कीच घाई झालीय.

बारामतीत सुप्रियाताईंचा विजय हा आदरणीय पवार साहेबांच्या विचारांचा, सुप्रियाताईंच्या कष्टाचा, मविआचे सर्व पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ते यांच्या त्यागाचा आणि दडपशाहीला झुगारलेल्या स्वाभिमानी सामान्य जनतेच्या प्रेमाचा आहे. या दणदणीत विजयाबद्दल सुप्रियाताईंचं मनापासून अभिनंदन!

**-रोहीत पवार**

# धंगेकरांचा १७ सी फॉर्म संदर्भात आक्षेप

**पुणे :** देशात पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार बहुमताने सत्तेवर येणार तसेच पुण्यातही भाजप उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचा विजयी होऊन आपला पराभव होणार हे स्पष्ट झाल्याने मंगळवारी सकाळी यांनी पुणे लोकसभा मतदारसंघातील ५३ बुथवरील १७ सी फॉर्मवर महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी या सर्व ५३ बुथवरील मतमोजणी यंत्रासह व्हीव्हीपॅटचीही तपासणी करावी, अशी मागणी सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

तर १७ सी फॉर्मवरून रडीचा डाव खेळत आहेत, असा आरोप भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी केला. पुणे लोकसभेचे काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी आहे. लोकसभा मतदारसंघातील ६ लोकसभा मतदारसंघातील ५३ बुथवरील १७ सी फॉर्ममधील मतदारांची एकूण संख्या लागत नाही, ईव्हीएम नंबर नाहीत. त्यामुळे या ५३ बुथवरील मतमोजणी मतदान यंत्रासह सर्व व्हीव्ही पॅडचीही मोजणी करण्याची मागणी धंगेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्याने मंगळवारी



सकाळी मतमोजणी येथील वातावरण बिघडले होते. या पार्श्वभूमीवर भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी पत्रकार परिषद घेऊन धंगेकर यांच्या आरोपाला उत्तर दिले. ते म्हणाले, मतदान १३ मे ला झाले, तेव्हापासून धंगेकर झोपले होते. आता मतमोजणी आली आणि ते जागे झाले. खरेतर विविध वृत्तवाहिन्यांनी दाखवलेल्या सर्वेमध्ये मोदी सरकार पुन्हा सत्तेवर येणार, हे स्पष्ट झाल्याने देशात उत्साहाचे वातावरण आहे. तसेच पुण्यातही मुरलीधर मोहोळ यांच्या रूपाने भाजपचा खासदार होणार आहे. आपला पराभव होणार आहे, हे स्पष्ट दिसत असल्याने स्टंटबाज रवींद्र धंगेकर यांनी १७ सी वरून आदळआपट सुरू केली आहे. त्यांचा हा आक्षेप बालिशपणा असून, ते रडीचा डाव खेळत असल्याचा आरोप घाटे यांनी केला.

## खासदार सुप्रिया सुळे यांच्या विजयाचा जेजुरीत जल्लोष

**जेजुरी :** बारामती लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी संपन्न होवून मतदारसंघाच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवार खासदार सुप्रिया सुळे विजयी झाल्या आहेत. या विजयानिमित्त जेजुरी शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व भंडारा उधळून जल्लोष केला.

खासदार सुप्रिया सुळे या लोकसभा निवडणुकीत सुमारे एक लाख ५३ हजार मतांनी विजयी झाल्या आहेत. त्यांच्या विजयानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक जयदीप बारभाई, जेजुरी शहर अध्यक्ष एन. डी. जगताप, प्रशांत लाखे, काँग्रेसचे माजी नगरसेवक सचिन सोनवणे, हेमंत सोनवणे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष ईश्वर दरेकर, अनिल पोकळे, पुरंदर तालुका शिवसेनेच्या अध्यक्ष अभिजित जगताप तसेच अरुण जोशी, माजी नगराध्यक्षा साधना दीडभाई, साधना दरेकर, अनिकेत हरपळे व मोठ्या संख्येने महविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली पुरंदर तालुक्यात महाविकास आघाडीच्यावतीने खासदार सुप्रिया सुळे यांचा मतदारसंघात घरोघरी जावून प्रचार केला. खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार संजय जगताप यांनी पाच वर्षांच्या काळात केलेल्या प्रचंड विकास कामांमुळे मतदारांनी विजयाची माळ खासदार सुप्रिया सुळे यांच्या गळ्यात घातली आहे, अशी प्रतिक्रिया माजी नगरसेवक हेमंत सोनवणे यांनी यावेळी बोलताना दिली.



विजयी उमेदवाराला मावळ लोकसभा

## निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्या हस्ते निवडणूक प्रमाणपत्राचे वितरण



**मावळ :** सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार श्री. श्रीरंग चंदू बारणे यांना निवडणूक निरीक्षक श्री. बुदीती राजशेखर, मतमोजणी निरीक्षक मोहम्मद हारुण यांच्या उपस्थितीत मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्या हस्ते विजयी झाल्याबद्दल निवडणूक प्रमाणपत्र देण्यात आले.

मावळ लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत 33 उमेदवार रिंगणात होते. या निवडणुकीची मतमोजणी बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे मतमोजणी कक्षात आज सुरळीत पार पडली, या निवडणुकीमध्ये श्री. बारणे विजयी झाले. त्यांना आज बालेवाडी येथील मतमोजणी कक्षात निवडणूक प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी मावळ लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचे निवडणूक समन्वयक प्रवीण ठाकरे,हिम्मत खराडे, पनवेल, कर्जत, उरण,मावळ, चिंचवड, पिंपरी विधानसभा मतदार संघांचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनुक्रमे राहुल मुंडके, अजित नैराळे, जनार्दन कासार, सुरेंद्र नवले, विठ्ठल जोशी, अर्चना यादव, निवडणूक सहाय्यक अभिजीत जगताप, सचिन मस्के, मनीषा तेलभाते, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमन, मनुष्यबळ कक्षाचे समन्वयक राजू ठाणगे, निरीक्षक समन्वयक प्रमोद ओंभासे, माध्यम कक्ष समन्वयक किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

शिरूरचे आमदार अशोक पवार ठरले हिरो

# एका मंत्र्यासह चार आमदारांना शिरुरचा आमदार ठरला भारी

**शिक्रापूर :** शिरुर लोकसभा मर्डर संघाचे चित्र तपासले असता शरद पवार गटाकडे एकमेव आमदार अशोक पवार हे होते मतदार संघातील पाच आमदार विरोधी गटाकडे असल्याचे आमदार अशोक पवार यांच्याकडे राज्याचे लक्ष लागलेले असता अखेर एकमेव आमदार सोबत असलेल्या गटाचे डॉ. अमोल कोल्हे विजयी झाल्याने शिरूरचे आमदार अशोक पवार हिरो ठरले आहे.

शिरुर मतदार संघात शिरुर, खेड, आंबेगाव, भोसरी, हडपसर व जुन्नर हे विधानसभा मतदार संघ येतात या मध्ये भोसरीमध्ये भाजपचाचे आमदार असून अन्य पाच ठिकाणी राष्ट्रवादीचे आमदार आहेत त्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर सर्व आमदार अजित पवार यांच्या सोबत



गेले मात्र अशोक पवार हे शरद पवार यांच्या सोबतच राहिले, दरम्यान अजित पवार भाजपासोबत राहिल्याने त्यांच्या गटाकडे पाच तर शरद पवार गटाकडे एक आमदार अशी स्थिती असल्याने येथे अजित पवार गट बाजी मारेल असे बोलले जात असताना दोन्ही गटांनी त्यांच्या पद्धतीने सभा घेऊन आपली बाजू मांडत निवडणुकीला सामोरे गेले, यावेळी अशोक पवार यांनी भाषणातून आपली ठाम भूमिका मांडून विरोधकांच्या तोंडचे पाणी पळवले त्यामुळे सध्याच्या लोकसभा निवडणुकीनंतर पुढील भूमिका स्पष्ट होणार असताना अखेर आज निवडणुकीचे मतदान बाबत निकाल स्पष्ट होत असताना अजित पवार गटाचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील या एका मंत्र्यासह खेडचे आमदार दिलीप मोहिते, हडपसरचे आमदार चेतन तुपे, जुन्नरचे आमदार अतुल बेनके, भोसरीचे भाजपाचे आमदार महेश लांडगे या चार आमदारांना शरद पवार गटाचे शिरुरचे आमदार अशोक पवार हे एकटे भारी पडले.

विजयाचा गुलाल अन् पुण्यात मान्सूनपूर्व पावसाची दमदार हजेरी

# भर पावसात कार्यकर्त्यांचा जल्लोष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील सर्वच भागांत मंगळवारी संध्याकाळी मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. पुण्यात भर पावसात कार्यकर्त्यांनी मुरलीधर मोहोळांच्या विजयाचा जल्लोष केला. भर पावसात कार्यकर्त्यांनी गुलाल उधळला.ताशी ४० - ५० किमी वेगाने वाहणारे वारे, ढगांचा गडगडाट, विजा आणि काही भागात गारा पडल्याचेही यावेळी अनुभवायला मिळाले. विविध भागांमध्ये तब्बल १ ते २ तास सुरू असलेल्या या पावसामुळे मंगळवारी



सायंकाळी पुणेकरांना आल्हाददायक वातावरणाची अनुभूती मिळाली.

राज्याच्या लोकसभा निवडणुकीचा निकाल लागला. त्यात पुण्यात मुरलीधर मोहोळांनी बाजी मारली आणि रवींद्र धंगेकरांना पराभूत केलं. त्यामुळे मुरलीधर मोहोळांच्या कार्यकर्त्यांच्या आनंदाला पारावार नव्हता. पुण्यातील अनेक परिसरात मुरलीधर मोहोळांच्या विजयाचा जल्लोष साजरा करण्यात येत आहे. ऐनवेळी पावसाने हजेरी लावली. कार्यकर्त्यांनी न थांबता भर पावसात जल्लोष साजरा केला.

पुणे शहर आणि लगतच्या परिसरावर ढगांची निर्मिती झाल्याने हा पाऊस पडला. दरम्यान हवामान विभागातर्फे पुणे शहर आणि परिसरासाठी ६ जूनपर्यंत मेघ गर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपातील पाऊसासाठी 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

#रा

अबकी बार २९१ पार



राष्ट्रसंचार

BREAKING NEWS AND MORE www.rashtrasanchar.com @rashtrasanchar बुधवार, ५ जून २०२४



# नेत्यांना जागा दाखवणारी निवडणूक



२०१९ च्या विधानसभेत राज्यातील जनतेने भाजप-शिवसेना युतीला कौल दिला होता. तो नाकारत उद्धव ठाकरे यांनी मविआचे सरकार राज्यावर लादले. एकनाथ शिंदे यांनी ठाकरे यांच्याविरोधात जाण्याचे धाडस दाखवत, बंडखोरी केली. तथापि, राज्यातील जनतेला त्यांची भूमिका पटली नाही, हेच लोकसभा निवडणुकीत अधोरेखित झाले आहे. उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी सातत्याने गेली दोन वर्षे त्यांच्याविरोधात अपप्रचार केला आणि त्याचे नेमकेपणाने खंडन करण्यात ते अपयशी ठरले. पक्षांतरबंदी कायद्याचा बडगा टाळण्यासाठी पक्षच नावावर करण्याचा शिंदे यांचा निर्णय उद्धव ठाकरे यांना संजीवनी देणारा ठरला. ठाकरे म्हणजेच शिवसेना हेच सामान्य शिवसैनिकाच्या मनावर कोरले गेलेले आहे. त्यामुळे एका शिवसैनिकाकडे सेनेची मालकी गेलेली त्याला रुचली नाही. केंद्रात आणि राज्यात सत्तेत सहभागी असूनही, शिंदे यांना मिळालेल्या संधीचे विजयात रुपांतर करता आले नाही. विधानसभा निवडणुकीत त्यांना विजय मिळवण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागतील. अन्यथा शिंदे यांचे भवितव्य अवघड आहे. लोकसभेचे निकाल हा त्यांच्यासाठी धोक्याचा इशारा देणारे ठरले आहेत. येणाऱ्या काळात त्यांना दिवसरात्र परिश्रम करावे लागतील."

— एकनाथ शिंदे



राज्यातील सर्वात मोठा पक्ष असा ज्या भाजपचा लौकिक आहे, त्या भाजपला राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आले तरीही मुख्यमंत्रीपद मिळाले नाही, ही शोकांतिका आहे. शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांना सोबत घेण्याचा देवेंद्र फडणवीस यांचा निर्णय योग्य ठरला होता. तथापि, अजित पवार यांनाही महायुतीत घेणे महाराष्ट्रात भाजपला महागात पडले. भाजपची प्रतिमेला त्यामुळे धक्का बसला. प्रादेशिक पक्षांना भाजप संपवायला निघाला आहे, असा चुकीचा संदेश त्यातून जनतेपर्यंत गेला. फडणवीस यांनीच अजित पवारांविरोधात आक्रमक प्रचार केला होता. गाडाभर पुरावे असल्याचे म्हटले होते. मात्र, त्याच अजित पवारांना सोबत घेत फडणवीस यांनी शपथविधीचा कार्यक्रम केल्याने, कार्यकर्तेही नाराज झाले. एकमेकांचे राजकीय विरोधक म्हणून जे तीन पक्ष आजपर्यंत विरोधात काम करत होते, ते एकाच व्यासपीठावर आले. मतदारांना गृहित धरू नका, असा स्पष्ट संदेश महाराष्ट्रातील जनतेने दिला आहे. भाजप नेतृत्वाने यातून योग्य तो बोध घेतला नाही, तर विधानसभा निवडणुकीत जनतेसमोर जाणेही अवघड ठरणार आहे. नेतृत्वात बदल करण्याची गरज या निकालांनी अधोरेखित केली आहे.

— देवेंद्र फडणवीस




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अनुकरण करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या नावावर केला आणि भाजप-शिवसेना सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. शरद पवारांनी जे फोडाफोडीचे राजकारण केले, त्याचाच कित्ता त्यांनी गिरवला. मात्र, पहाटेच्या शपथविधीने त्यांची विश्वासार्हता संपुष्टात आली होती. भाजपसोबत जाण्याचा त्यांचा निर्णय त्यांना महागात पडला. बारामती या शरद पवारांच्या बालेकिल्ल्यात त्यांनी सुप्रिया सुळे यांच्याविरोधात पत्नी सुनेत्रा पवार यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आणि त्यामुळे शरद पवार पुन्हा एकदा सक्रीय झाले. सुप्रिया सुळे यांचा विजय निश्चित करण्यासाठी पवार यांनी त्यांच्या राजकीय विरोधकांच्या भेटीघाटी घेतल्या आणि जुने-नवे कार्यकर्ते कामाला लावले. अजित पवारांची प्रतिमा माध्यमांनी चुकीच्या पद्धतीने रंगवली आणि त्याचे त्यांना खंडन करता आले नाही. राजकारणात माझ्यासारखेच टगेच लागतात, असे म्हणत त्यांनी स्वतःच्या प्रतिमेचे समर्थन केले होते. तेही त्यांच्या अंगलट आले. स्वतःची प्रतिमा बदलण्याचे काम त्यांना आता प्राधान्याने करावे लागेल. अन्यथा विधानसभा निवडणुकीत त्यांचे उरलेसुरले राजकीय अस्तित्व पुसले जाईल. हाच संदेश लोकसभेने अजित पवारांना दिला आहे.

— अजित पवार



स्वतःची मुख्यमंत्रीपदाची इच्छा पूर्ण करण्यासाठी बंद खोलीत न दिलेल्या वचनांचा दाखला देत, काँग्रेससमोर सत्तेसाठी झुकलेले ठाकरे, असे उद्धव ठाकरे यांच्याबद्दल म्हणता येईल. मविआचे मुख्यमंत्री म्हणून अपयशी ठरलेल्या उद्धव ठाकरे यांना एकनाथ शिंदे यांनी मोठी संधी दिली. एकनाथ शिंदे यांनी माझा पक्ष चोरला, चिन्ह चोरले असे म्हणत ते राज्यभर दौरे करत राहिले. मुख्यमंत्र्यांवर आणि भाजपवर त्यांनी सातत्याने टीका केली. जनतेच्या मनात सहानुभूती निर्माण केली. मशाल हे चिन्ह मतदारांपर्यंत त्यांनी यशस्वीपणे पोहोचवले. त्याचा परिणाम म्हणून त्यांना घवघवीत यश लोकसभेत मिळाले. शरद पवार गटापेक्षा जास्त जागांवर त्यांचे उमेदवार विजयी झाले आहेत. राज्यात विधानसभा निवडणूक होत असताना, उद्धव ठाकरे यांना शरद पवार यांच्यापेक्षा जास्त जागा मिळाल्या आहेत. म्हणजेच, येत्या काळात राष्ट्रीय पातळीवर त्यांना महत्त्व प्राप्त होणार आहे. मुंबईच्या बाहेर आता ते राष्ट्रीय नेते म्हणून ओळखले जातील. वंचितच्या प्रकाश आंबेडकरांनी त्यांना भाजपसोबत जाणार नाही, असे लेखी द्यायला सांगितले होते. काँग्रेसला दुय्यम स्थान देत त्यांनी जागावाटपात पदरात पाडून घेतलेल्या जास्तीच्या जागा त्यांना यश देणाऱ्या ठरल्या आहेत.

— उद्धव ठाकरे



वयाच्या ८३ व्या वर्षी बालेकिल्ला वाचवण्यासाठी तसेच स्वतःची प्रतिमा जपण्यासाठी शरद पवार यांना पुन्हा एकदा राजकारणात सक्रीय व्हावे लागले, ही शोकांतिकाच आहे. २०१९ मध्ये पावसात भिजणारे शरद पवार यंदा सुकन्या सुप्रिया सुळे हिचे राजकीय भवितव्य सावरण्यासाठी आपल्या कट्टर राजकीय वैऱ्यांना भेटताना दिसून आले. बैल म्हातारा झाला की, त्याला बाजारच दाखवावा लागतो, असे शरद पवारांनी ज्या दादा जाधवराव यांच्याबद्दल ते ६५ वर्षांचे झाल्यावर म्हटले होते, त्याच जाधवराव यांची भेट शरद पवारांना घ्यावी लागली. अनंतराव थोपटे या भोरमधील काँग्रेसी नेत्याच्या घरीही त्यांना जावे लागले. ज्या वयात सक्रीय राजकारणातून निवृत्ती घ्यायची, त्या वयात त्यांना मुलीचा विजय निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र पालथा घालावा लागला. शरद पवार यांच्या नंतर राजकारणात आलेल्या अनेक नेत्यांनी स्वबळावर सरकार स्थापन करून मुख्यमंत्रीपदी ते विराजमान झालेही. शरद पवार यांनी कायमच बेरीज-वजाबाकीचे राजकारण केले, अजित पवारांनी त्यांचेच अनुकरण केले. मात्र, ते अपयशी ठरले. आता शरद पवार काय भूमिका घेतात, याकडे राज्याचे लक्ष असेल हे नक्की.

— शरद पवार



काँग्रेसच्या नाना पटोले यांना अनपेक्षितपणे लॉटरी लागली आहे. कोणतेही कर्तृत्व नसताना आणि प्रचारात विशेष कष्ट न करता घवघवीत जागा काँग्रेसच्या पदरात पडल्या आहेत. महाराष्ट्रात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी रिंगणात होत्या. शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांमधील अंतर्गत कलहाचा फायदा काँग्रेसला झाला. २०१९ च्या विधानसभेतही काँग्रेसला अशाच अनपेक्षित जास्तीच्या जागा मिळाल्या होत्या. विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आता जागावाटपात जास्तीच्या जागा हक्काने मागून घेवू शकतो. गेल्या वेळी काँग्रेसचे देशभरात ५२ खासदार होते आणि आता महाराष्ट्रातून काँग्रेसला बळ देण्याचे काम नाना पटोले यांच्या कार्यकाळात झाले आहे. या संधीचा फायदा ते कसा करून घेतात, यावर त्यांची राजकीय कारकिर्द अवलंबून आहे. भाजप, शिवसेना, उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादी, शरद पवार गट राज्यात असताना, काँग्रेसला मिळालेले यश हे लक्षणीय असेच आहे. विधानसभा निवडणुकीत हाच कल कायम राहिल्यास, काँग्रेसच्या नावावर एक राज्य झालेले दिसेल.

— नाना पटोले

## ४८ मतदारसंघांमध्ये हे उमेदवार झाले विजयी

१) दक्षिण मुंबई – अरविंद सावंत – ठाकरे गट
२) दक्षिण मध्य मुंबई – अनिल देसाई – ठाकरे गट
३) उत्तर पश्चिम मुंबई – अमोल कीर्तीकर – ठाकरे गट
४) बुलढाणा – प्रतापराव जाधव – शिंदे गट
५) ठाणे – नरेश म्हस्के – शिंदे गट
६) कल्याण – श्रीकांत शिंदे – शिंदे गट
७) नाशिक – राजाभाऊ वाजे – ठाकरे गट
८) औरंगाबाद – संदीपान घुमरे – शिंदे गट
९) हिंगोली – नागेश पाटील – ठाकरे गट
१०) यवतमाळ – संजय देशमुख – ठाकरे गट
११) हातकणंगले – धैर्यशील माने – शिंदे गट
१२) मावळ – श्रीरंग बारणे – शिंदे गट
१३) शिर्डी – भाऊसाहेब वाकचौरे – ठाकरे गट
१४) बारामती – सुप्रिया सुळे- शरद पवार गट
१५) शिरुर – डॉ. अमोल कोल्हे – शरद पवार गट
१६) उत्तर मुंबई – पियूष गोयल – भाजप
१७) उत्तर मध्य मुंबई – वर्षा गायकवाड – काँग्रेस
१८) नंदुरबार – गोवाल पाडवी– काँग्रेस
१९) धुळे – डॉ. शोभा बच्छाव – काँग्रेस (आघाडी)
२०) जालना – कल्याण काळे – काँग्रेस
२१) लातूर – शिवाजीराव काळगे – काँग्रेस
२२) नांदेड – वसंत चव्हाण – काँग्रेस
२३) अकोला – अनुप धोत्रे – भाजप
२४) अमरावती – बळवंत वानखेडे – काँग्रेस
२५) नागपूर – नितीन गडकरी – भाजप
२६) भंडारा-गोंदिया –प्रशांत पडोले– काँग्रेस
२७) गडचिरोली – डॉ. नामदेव किरसान – काँग्रेस
२८) चंद्रपूर – प्रतिभा धानोरकर – काँग्रेस
२९) पुणे – मुरलीधर मोहोळ – भाजप
३०) सोलापूर – प्रणिती शिंदे – काँग्रेस
३१) भिवंडी – बाळामामा म्हात्रे – शरद पवार गट
३२) दिंडोरी – भास्करराव भगरे – शरद पवार गट
३३) रावेर – रक्षा खडसे – भाजप
३४) बीड – पंकज मुंढे– भाजप (आघाडीवर)
३५) वर्धा – अमर काळे– शरद पवार गट
३६) माढा – धैर्यशील पाटील – शरद पवार गट
३७) सातारा – उद्यनराजे भोसले – भाजप
३८) अहमदनगर – निलेश लंके – शरद पवार गट
३९) मुंबई उत्तर पूर्व – संजय दिना पाटील – ठाकरे गट
४०) पालघर – डॉ. हिमंत सावरा – भाजप
४१) सिंधुदुर्ग – नारायण राणे – भाजप
४२) जळगाव – स्मिता वाघ – भाजप
४३) सांगली – विशाल पाटील – अपक्ष
४४) रायगड – सुनील तटकरे– अजित पवार
४५) धाराशिव – ओमराजे निंबाळकर – ठाकरे
४६) परभणी – संजय जाधव – ठाकरे
४७) रामटेक – श्यामकुमार बर्वे – काँग्रेस
४८) कोल्हापूर – शाहू महाराज छत्रपती – काँग्रेस

## धंगेकर पॅटर्न फेल

**पुणे :** लोकसभेच्या जागेसाठी अटीतटीच्या झालेल्या लढतीत काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर पिछाडीवर पडल्यानंतर काँग्रेस भवनात शुकशुकाट पसरला. गेले दोन महिने कार्यकर्त्यांचा सातत्याने वावर या ऐतिहासिक वास्तूमध्ये होता; पण काँग्रेसच्या उमेदवाराचा पुण्यातून सलग तिसरा पराभव झाल्यानंतर या परिसरात नीरव शांतता पसरली होती.

भाजपने माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली तर, कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार हेमंत रासने यांचा पराभव करणाऱ्या धंगेकर यांच्यावर काँग्रेसने पुन्हा विश्वास दाखविला. धंगेकर यांच्यामागे काँग्रेसने राज्यातील पूर्ण ताकद उभी केली. राज्यात पहिल्या टप्प्यात विदर्भातील निवडणुका झाल्या. काँग्रेसचे तेथील राज्य पातळीवरील सहा आजी-माजी आमदार पुण्यात दाखल झाले. त्यामुळे काँग्रेसच्या प्रचार यंत्रणेला वेग आला. दररोज काँग्रेस भवनात कार्यकर्ते, नेते, पक्षाचे समर्थक यांची लगबग सुरू होती. विविध नेत्यांच्या पत्रकार परिषदा, निवडणुकीचे नियोजन, त्यासाठी आवश्यक व्यवस्था यामुळे काँग्रेस भवन परिसर गजबजला होता. मंगळवार सकाळपासून धंगेकर पिछाडीवर असल्याची माहिती पुढे येऊ लागली. मतमोजणीच्या एकेका फेरीनंतर मोहोळ यांना आघाडी मिळू लागली. त्याचा थेट परिणाम काँग्रेस भवनावर दिसू लागला. कार्यकर्ते, नेते यांनी काँग्रेस भवनाकडे पाठ फिरवली. काँग्रेसच्या शहर पातळीवरील काही कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवनात हजेरी लावली होती.

## ऑल इज वेल...

## बारामतीच्या विजयातून शरद पवारांचा थेट संकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशाचे लक्ष लागलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांचा तब्बल १ लाख मतांनी पराभव केला आहे. नणंद-भावजय लढतीत अखेर नणंदच 'वरचढ' ठरली. शरद पवार यांचा करिष्मा आजही बारामतीत कायम असल्याचे या निकालाने अधोरेखीत केले.

निवडणूकीत अजित पवार यांचे कुटुंबिय वगळता इतर बहुसंख्य पवार कुटुंबियांनी सुप्रिया सुळे यांना साथ देण्याचा निर्णय घेत त्यांचा प्रचार केला. अजित पवार यांनी घेतलेली भूमिका काही मतदारांना रुचली नाही. त्याचा फटका या निवडणूकीत त्यांना सहन करावा लागला. स्वत: अजित पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघात प्रचाराचा झंझावात केला होता, मात्र मतदारांनी शरद पवार यांच्या मागे उभे राहण्याचा निर्णय घेतल्याचे निकालातून स्पष्ट झाले. अत्यंत चुरशीची निवडणूक होईल असा अंदाज वर्तविला गेला होता मात्र अपवाद वगळता बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, भोर व खडकवासला या सहाही विधानसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे यांनी पहिल्या फेरीपासूनच आघाडी घेतली होती, ती शेवटच्या फेरीपर्यंत कायमच राहिली.



## शिरूरमधून कोल्हेंना आघाडी मिळताच कार्यकर्त्यांचा जल्लोष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरूर मतदार संघाच्या जागेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले असताना निवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना शिरुरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी सुरुवातीपासून आघाडी घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी पुणे नगर महामार्गावर जल्लोष केला.

शिरूर लोकसभा मतदारसंघात खासदार डॉ. अमोल कोल्हे विरुद्ध माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील अशी चुरशीची लढत होत असताना अनेक घडामोडी घडल्या, त्यात शिवसेना व राष्ट्रवादीचे दोन गट पडल्याने उमेदवारांची मोठी कसरत झालेली असताना शिवसेनेतून शिंदे गटात गेलेले माजी खासदार आढळराव पाटील राष्ट्रवादी अजित पवार गटात गेले आणि उमेदवारी मिळवली, तर निवडणुकीच्या प्रचाराच अजित पवार यांनी अमोल कोल्हे यांच्यावर टीका करत निवडून कसा येतो असा शब्द दिला होता तर अजित पवार गटाकडे या मतदार संघातून एक मंत्री व चार आमदार सोबत होते त्यामुळे या जागेकडे सर्वांचे लक्ष लागलेले असताना आज निकाल जाहीर होत असताना डॉ. अमोल कोल्हे यांनी सुरुवातीपासून आघाडी घेतली असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवक जिल्हाध्यक्ष स्वप्नील गायकवाड, उद्योजक अनिल गायकवाड, नितीन काकडे यांसह आदींनी फटाक्यांची आतषबाजी करत घोषणाबाजी करुन जल्लोष करुन आनंदोत्सव साजरा केला आहे.




## शिरुर मधून अमोल कोल्हे दीड लाख मतांनी विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** शिरुर लोकसभा मतदार संघाकडे सर्वांचे लक्ष लागलेले असताना येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे डॉ. अमोल कोल्हे विरुद्ध राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे शिवाजी आढळराव पाटील अशी लढत झालेली असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे डॉ. अमोल कोल्हे यांना ६ लाख ९८ हजार ३०७ तर शिवाजीराव आढळराव पाटील यांना ५ लाख ५७ हजार ४८९ मते मिळाली असता तब्बल १ लाख ४० हजार ८१८ मताने डॉ. अमोल कोल्हे विजयी झाले आहे.

शिरुर लोकसभा मतदार संघात तब्बल तीन वेळा शिवसेनेचे शिवाजीराव आढळराव पाटील खासदार म्हणून निवडणून आलेले असताना मागील वर्षी अचानक राष्ट्रवादी कडून डॉ. अमोल कोल्हेंना उमेदवारी मिळाली आन कोल्हे विजयी झाले त्यांनतर शिवसेनेत दोन गट पडताच शिवाजीराव आढळराव पाटील शिंदे गटात गेले आणि राष्ट्रवादी मध्ये दोन गट पडल्यानंतर कोल्हे शरद पवार यांच्या सोबत राहिले त्यांना उमेदवारी देखील जाहीर झाली मात्र येथील जागा अजित पवार यांच्या गटाला गेल्याने

भारतीय जनता पक्षाच्या 'चारसो पार'ला सर्वात मोठा धक्का महाराष्ट्राने आणि उत्तर प्रदेशने दिला. महाराष्ट्रात तर दोन राजकीय पक्ष फोडूनही भाजपच्या ४५ प्लसच्या स्वप्नाला तडा गेला. राज्याच्या निकालाचा एकूण कल पाहता कोकण वगळता बहुतांश ठिकाणी महाविकास आघाडीने मजल मारली. मराठवाड्यात मराठा आरक्षणाचा मोठा फटका भाजपला बसल्याचे दिसते.

# लोकसभेच्या निकालाने विधानसभेचे गणित बदलणार

## कोकण वगळता महाराष्ट्राने युतीकडे फिरविली पाठ

राज्यात महायुती ४५हून अधिक जागा जिंकेल, असे जे सांगितले जात होते, तो भ्रम होता. ग्राऊंड रिपोर्ट वेगळाच होता.

## विदर्भ : गडकरींमुळे नाक शाबूत



- विदर्भ हा भाजपचा बालेकिल्ला होता. त्याला तडा देण्याचे काम या वेळी महाविकास आघाडीने केले आहे. त्याचा परिणाम विधानसभेच्या निवडणुकीतही होईल. अवास्तव अपेक्षा केल्या, की काय होते, हे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनाही कळले असेल. पाच-सहा पदरात पाडून घेतल्या असत्या, तर किमान दोन जागा तरी निवडून आणता आल्या असत्या आणि राज्यात महायुतीला आणखी दहा जागांवर किमान फटका बसला असता;परंतु ते व्हायचे नव्हते. या अनुभवातून धडा घेऊन आता वंचित बहुजन आघाडी विधानसभेत महाविकास आघाडीबरोबर येते का, यावर बरीच गणिते अवलंबून आहेत.
- नागपूरमधील नितीन गडकरी यांच्या एकमेव जागेबाबत खात्रीने सांगितले जात होते. ते निवडून आले; परंतु आ. विकास ठाकरे यांनी त्यांचा एकतर्फी विजय होऊ दिला नाही. सुधीर मुनंगटीवार यांनी वारंवार नकार देऊनही त्यांना बळजबरीने घोड्यावर बसवण्यात आले;परंतु त्यांचा घोडा धावलाच नाही. मागच्या वेळी केंद्रीय गृहराज्यमंत्री राहिलेल्या हंसराज अहीर यांचा पराभव करून राज्यातील एकमेव जागा बाळू धानोरकर यांनी काँग्रेसला मिळवून दिली. त्यांच्या निधनानंतर ही जागा रिक्त होती. काँग्रेसने तिथे प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी दिली. त्यांनी मुनगंटीवार यांचा पराभव केला. देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिष्ठा पणाला लावूनही ही जागा हातून गेली. गडचिरोली मतदारसंघातही काँग्रेसच्या डॉ. नामदेव किरसान यांनी कमाल केली. भाजपच्या अशोक नेते यांच्याविरोधात नाराजी असूनही उमेदवारी न बदलल्याचा फटका त्यांना बसला. अमरावती मतदारसंघात भाजप, अजित पवार गट, शिंदेसेना यांचा विरोध असतानाही नवनीत राणा यांनी या सर्वांच्या नावावर टिच्चून उमेदवारी आणली. महायुतीचा घटक पक्ष असलेल्या प्रहार संघटनेने तिथे उमेदवार दिला. या लोकसभा मतदारसंघात 'प्रहार'चे दोन आमदार आहेत. तिरंगी लढतीने राणा यांच्यांशी काँग्रेसच्या बळवंत वानखेडे यांनी दोन हात केले. अखेर नवनीत राणा यांना मान हानिकारक पराभव पत्करावा लागला.
- विदर्भातील अधिक चर्चेत राहिलेला मतदारसंघ म्हणजे वाशिम-यवतमाळ. या मतदारसंघातून भावना गवळी यांना डावलून हिंगोलीच्या राजश्री पाटील यांना उमेदवारी देण्याचा निर्णय महागात पडला. गवळी यांची नाराजी भोवली. अकोल्यात काँग्रेसने प्रथमच मराठा समाजाचा उमेदवार दिला. त्याचा फायदा या वेळी काँग्रेसला दिला. भाजपने संजय धोत्रे यांच्याऐवजी त्यांचे चिरंजीव अनुप धोत्रे यांना उमेदवारी दिली. ॲड. आंबेडकर यांनी लढत चांगली दिली; परंतु पाटील यांना जनतेने साथ दिली. रामटेक मतदारसंघातून काँग्रेसच्या उमेदवाराचे जातप्रमाणपत्र ऐन निवडणुकीच्या काळात रद्द करण्यात आले. काँग्रेसने तिथे त्यांचे पती शामकुमार बर्वे यांना उमेदवारी देऊनही त्यांनी आघाडी घेतली. काँग्रेसच्या अमर काळे यांना राष्ट्रवादीत आणून शरद पवार यांनी वर्ध्यातून उमेदवारी दिली. त्यांचा निर्णय योग्य ठरला.
- कोल्हापूर ते नगर या पट्यातच शरद पवार यांची ताकद आहे, या टीकेला आता उत्तर मिळाले आहे. विदर्भात कापूस, सोयाबीनचे भाव आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडे सरकारचे दुर्लक्ष या बाबीचा फटका महायुतीला बसला. तसेच शिंदे गट, अजितदादांचा पक्ष आणि भाजपचे कुरघोडीचे राजकारण अंगलट आले.

## पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादी साहेबांचीच



**पश्चिम** महाराष्ट्रात लोकसभेचे दहा मतदारसंघ आहेत. पवार यांनी कोल्हापूरमधून शाहू महाराज यांना निवडणुकीत उतरायला भाग पाडले. त्यांचा हा डाव यशस्वी झाला. शिरूरमधून अपेक्षेप्रमाणे डॉ. अमोल कोल्हे यांनी विजय मिळवला. देशाचे लक्ष लागलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे दोनच आमदार असतानाही खा. सुप्रिया सुळे यांनी पुन्हा विजय मिळवला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा यांना पराभवाला सामोरे जावे लागले. बारामतीत मीच कामे केली, असा दावा अजितदादांना केला होता.

शरद पवार यांच्याबरोबर राहिल्याने कामे करता आली, हा संदेश बारामतीतील जनतेने दिला. पुणे लोकसभा मतदारसंघाचा निकाल अपेक्षित होता; परंतु रवींद्र धंगेकर यांनी प्रतिकूल परिस्थितीत दिलेली लढत स्तुत्य अशीच होती.

सोलापूर लोकसभा मतदारसंघात दोनदा झालेल्या सुशीलकुमार शिंदे यांच्या पराभवाचा वचपा प्रणिती शिंदे यांनी काढला. त्यांना नरसय्या नाडम मास्तर आणि विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मदतीचा उपयोग झाला. सत्तेचा दुरुपयोग करून सहकारी संस्थाचालकांना भीती दाखवून स्वतःबरोबर घेण्याचा भाजपचा प्रयत्न माढ्यात यशस्वी झाला नाही. पंढरपूर येथील अभिजीत पाटील यांच्या बद्दल सुडाचे राजकारण केले गेले. सकाळी शरद पवारांची सभा घेणाऱ्या त्या अभिजीत पाटील याला संध्याकाळी महायुतीची सभा घ्यायला भाग पाडले एका दिवसात एवढा बदल नरड्यावरती पाय देऊन करायला लावला , जनतेला हे अजिबात आवडले नाही चाणक्य असलेले देवेंद्र फडणवीस येथे शकुनीसारखे का वागले हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आला .

सर्व आमदार महायुतीचे असताना जनता बरोबर असली, तर काय होते, हे धैर्यशील मोहिते पाटलांच्या विजयाने दाखवून दिले.

मावळमध्ये श्रीरंग बारणे यांनी अजितदादा गटाचे सहकार्य मिळाले नसल्याचा आरोप केला असला, तरी ते विजयी झाले. महाराष्ट्रात एकच अपक्ष विजयी झाला. वसंतदादा यांच्या नातवाला मतदारसंघ न सोडल्याचा पश्चाताप आता शिवसेनेच्या ठाकरे गटाला होत असेल. काँग्रेसने उघडउघड विशाल पाटील यांचे काम केल्याचे निकालावरून दिसते. त्याचा परिणाम किमान सांगलीत तरी महाविकास आघाडीत बिघाडी होण्यात होऊ शकतो. साताऱ्यात उदयनराजे यांनी बाजी मारली असली, तरी त्यांना झुंजावे लागले. हातकणंगले लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढतीचा फायदा शिंदे सेनेच्या धैर्यशील माने यांना झाला. राजू शेट्टी यांचा स्वबळाचा नारा त्यांना नडला.

## मराठवाडा : कट्टर जातीभेदाची पेरण युतीच्या मुळावर



- मराठवाड्यात लोकसभेच्या आठ जागा असून यापूर्वी छत्रपती संभाजीनगरची जागा वगळता उर्वरित सर्व जागांवर भाजप-शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले होते. या वेळची परिस्थिती उलट झाली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि बीड हे दोन लोकसभा मतदारसंघ महायुतीकडे जाताना दिसत होते. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपत प्रवेश करूनही भाजपचा फारसा फायदा झाला नाही. उलट नांदेडच्या जागेवर अटीतटीची लढत होत होती. मराठवाड्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा गाजला. त्याचा फटका केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसेब दानवे यांना बसलेला दिसतो. राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांनी शरद पवार यांची भेट घेऊन माढ्यातील उमेदवारी पदरात पाडून घेतली आणि नंतर अचानक महायुतीची वाट धरली;परंतु परभणीने त्यांना नाकारले. शिवसेनेत फूट पडल्यानंतर मराठवाड्यातील दोन खासदार ठाकरे यांच्याबरोबर होते, ते पुन्हा निवडून आले. परभणी आणि धाराशिवची जागा ठाकरे गटाने राखली. त्याचबरोबर हिंगोलीत शिंदे सेनेला भाजपने हेमंत पाटील यांची उमेदवारी बदलायला लावली, तरी ठाकरे गटाने येथून विजय मिळवला. लातूरला विलासराव देशमुख यांचे चिरंजीव अमित आणि बंधू दिलीप देशमुख यांनी गेल्या दहा वर्षांनंतर काँग्रेसला विजय मिळवून दिला.

## उत्तर महाराष्ट्र फाजील आत्मविश्वासाने घालवला

- नाशिक-नगर या जिल्ह्यात नगदी पिके मोठ्या प्रमाणात आहेत. हा कांदा उत्पादक प्रदेश आहे. कांदा, द्राक्षे आणि केळीचे पडलेले भाव, केंद्र सरकारची त्याबाबतची धोरणे आणि मतदानाच्या दिवशी शेतकऱ्यांनी कांद्याच्या माळा घालून मतदान केंद्रावर लावलेली हजेरी पाहता नगर, नाशिक, दिंडोरी, शिर्डी आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात काय होणार, हे अपेक्षितच होते. नाशिकमध्ये मतदारसंघ घातलेला घोळ आणि छगन भुजबळ यांची नाराजी महायुतीला भोवली. भुजबळ शेवटपर्यंत नाराज होते. नरहरी झिरवळ शरीराने अजितदादांसोबत आणि आतून शरद पवार यांच्यासोबत असे असल्याने दुसरे काहीच घडणार नव्हते. या दोन्ही जिल्ह्यात विधानसभेचे निकालही तितकेच आश्चर्यकारक लागतील. बाळासाहेब थोरात यांचे महत्त्व राज्याच्या राजकारणात अधिक वाढणार आहे. विखे यांची मात्र आता पक्षातही आणि बाहेरही कोंडी होणार आहे.
- उत्तर महाराष्ट्रात महायुतीने गेल्या वेळी आठच्या आठ जागा जिंकल्या होत्या. या वेळी तिथल्या दिग्गजांना महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी धडा शिकवला आहे. मंत्री भारती पवार आणि डॉ. सुजय विखे यांचा अपेक्षेप्रमाणे पराभव झाला आहे. जळगाव जिल्ह्यातील दोनही जागा महायुतीने राखल्या असल्या, तरी नंदुरबारमध्ये विजयकुमार गावीत यांचे संस्थान काँग्रेसने खालसा केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापेक्षा टोलेजंग सभा प्रियंका गांधी यांनी घेतली होती.
- गोपाल पाडवी यांनी वडिलांच्या पराभवाचा बदला घेतला. धुळ्यात काँग्रेसमध्ये मोठी गटबाजी असूनही अखेरीस डॉ. शोभा बच्छाव यांनी भाजपच्या डॉ. सुभाष भामरे यांना पराभुत करण्याची अनपेक्षित कामगिरी केली. शिर्डीतून दहा वर्षांनंतर भाऊसाहेब वाकचौरे राधाकृष्ण विखे यांच्या नाकावर टिच्चून खासदार झाले. मागच्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्याच पाच आमदारांचा आणि शिवसेनेच्या एका आमदाराचा पराभव घडवून आणलेल्या विखे यांना मुलाच्या पराभवातून आणि स्वतःच्या शिर्डी लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवाराच्या पराभवातून मोठी किंमत चुकवावी लागली.

**कोकणाची साथ :** कोकणाने महायुतीवर विश्वास व्यक्त केला. पालघरपासून रत्नागिरी-सिंधुदुर्गपर्यंत महायुतीचा झेंडा फडकला. या भागात महाविकास आघाडीचे काहीच चालले नाही. ठाण्यातील दोन्ही लोकसभा मतदारसंघात शिवसेनेच्या शिंदे गटाने, पालघर आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात भाजपने बाजी मारली. नारायण राणे यांनी दीपक केसरकर यांच्याबरोबर मैत्री करून मुलाच्या दोनदा झालेल्या पराभवाचा वचपा काढला. मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघापैकी चार जागांवर महाविकास आघाडीचा दबदबा राहिला. यामुळे मुंबई कोणाची तर ठाकरेंचीच हे सिद्ध झाले. पूनम महाजन यांना तिकीट नाकारून उज्वल निकम यांना देण्यात आले; परंतु काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी लढून



विजयाला गवसणी घातली. संजय दिना पाटील, अरविंद सावंत, अनिल देसाई या शिलेदारांनी मुंबईवर कुणाचे वर्चस्व आहे. हे सिद्ध केले. राज ठाकरे बरोबर येऊनही फारसा फायदा झाल्याचे दिसले नाही. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी ठाकरे यांचे मनोधैर्य आणखी वाढले आहे.



## पश्चिम महाराष्ट्राने वेधले देशाचे लक्ष

**पुणे** लोकसभा निवडणुकीच्या दहा जागा असलेल्या पश्चिम महाराष्ट्राने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. राज्यातील सर्वात जास्त चर्चा असलेले मतदारसंघ बहुतांशाने याचे विभागात होते, असे म्हणता येईल. देशपातळीवर उत्कंठा लागून राहिलेला बारामती, देशातील एक प्रगत शहर असा लौकिक असलेला पुणे, छत्रपती घराण्याशी संबंधित कोल्हापूर व सातारा येथील निकालांबाबत सर्वत्र उत्सुकता होती. सोलापूर, माढा, हातकणंगले, शिरूर या अन्य जागांच्या निकालांबाबतही उत्कंठा होती. बारामतीमध्ये पवार घराण्यातीलच दोन महिला एकमेकींसमोर उभ्या ठाकल्या होत्या. अखेरीस शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांनी लाखभर मतांची आघाडी घेऊन ही लढत जिंकली. या निवडणुकीत अनेक आरोप-प्रत्यारोप झाल्याने दीर्घकाळ चर्चा रंगली. राज्याच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी ही लढत ठरणार असल्याचे संकेत त्यातून मिळत आहेत. कोल्हापूर आणि सातारा या दोन्ही गाद्यांचे वारसदार आता देशाच्या प्रतिनिधीगृहात जाणार आहेत, हेही या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. पुण्यात भाजपचे मुरलीधर मोहोळ यांनी काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांना पराभूत केले. मात्र, धंगेकर यांनी प्रारंभी एकतर्फी वाटणाऱ्या या सामन्यात चुरस निर्माण केली. शिरूरमध्ये डॉ. अमोल कोल्हे यांनी निवडणुकीच्या आधी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेले शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला. सोलापूरमध्ये काही फेऱ्यांत मागे पडलेल्या प्रणिती शिंदे यांनी भाजपच्या राम सातपुते यांचे आव्हान परतवून लावले.

## दानवेंना हरविणारे काळे जायंट किलर

**गेल्या** २० वर्षांपासून रावसाहेब दानवे हे जालना मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. यावेळी कल्याण काळे यांच्या रुपात त्यांच्यासमोर मोठे आव्हान उभे होते. दुसरीकडे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे यांच्या भूमिकेमुळे जालन्यातील राजकारण चांगलेच बदलले. त्यामुळे यावेळी नेमके काय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. मात्र येथे कल्याणराव काळे यांनी विजयी कामगिरी केली आहे. काळे यांनी दानवे यांचा ६५ हजार मतांच्या फरकाने पराभव केला आहे. जालना लोकसभा मतदारसंघांमध्ये जालना जिल्ह्यातील जालना, बदनापूर, भोकरदन तर छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील सिल्लोड, फुलंब्री, पैठण या एकूण सहा विधानसभा क्षेत्राचा समावेश आहे. यापैकी चार मतदारसंघात महायुतीचा प्रभाव आहे. परंतु या निकालामुळे स्थानिक राजकीय वातावरण ढवळून निघण्याची चिन्हे दिसत आहेत. विधानसभा निवडणुकीत देखील काट्याची लढत पहायला मिळणार आहे.

# महाराष्ट्राने दिला महाविकास आघाडीला चांगला हात

## विधानसभानिहाय प्राबल्यात शरद पवार व उद्धव ठाकरे यांची सरशी

**मुंबई :** महाराष्ट्राने विरोधी महाविकास आघाडीला चांगलाच हात दिला असून, कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्राने महायुतीकडे पाठ फिरवली आहे. गेल्या वेळच्या निवडणुकीत केवळ एका जागेवर समाधान मानावे लागलेल्या काँग्रेसच्या पदरात मतदारांनी तब्बल १३ जागांचे माप टाकले आहे. आघाडीतील शिवसेना (उद्धव ठाकरे) व राष्ट्रवादी (शरद पवार) यांनीही चांगली कामगिरी करत विधानसभानिहाय प्राबल्यात महायुतीला मात दिली आहे. ठाकरे व पवार यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या पक्षांनी अनुक्रमे १३ व ७ मतदारसंघांमध्ये विजयश्री खेचून आणली आहे. भाजपला १० जागा मिळाल्या असल्यातरी गेल्या वेळेपेक्षा त्यांच्या जागा घटल्या आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला ७ जागांसह माफक प्रमाणात यश मिळत असताना राष्ट्रवादीची (अजित पवार गट) मात्र केविलवाणी अवस्था झाली आहे. या पक्षाला सुनील तटकरे यांच्या रूपाने एकमेव जागा मिळाली आहे.

मुंबईवरील वर्चस्वाच्या लढतीत ठाकरे गटाने तीन मतदारसंघात बाजी मारली. अरविंद सावंत (दक्षिण), अनिल देसाई (दक्षिण मध्य) यांनी शिवसेनेच्या यामिनी जाधव, राहुल शेवाळे यांचा, तर इशान्य मुंबईत संजय दीना पाटील यांनी भाजपचे मिहीर कोटेचा यांचा पराभव केला. उत्तर मध्य मुंबईत वर्षा गायकवाड यांनी ॲड. उज्ज्वल निकम यांचा पराभव केला. उत्तर मुंबईत केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांचा मोठा विजय व वायव्य मुंबईत रविंद्र वायकर यांनी अमोल किर्तीकर यांचा केलेला निसटता पराभव ही महायुती व भाजपच्या दृष्टीने जमेची बाजू ठरली. कोकणात मात्र ठाकरे गटाला अपेक्षित यश मिळू शकले नाही. सिंधुदुर्ग रत्नागिरीत केंद्रीय मंत्री नारायण राणे (भाजप) यांनी विनायक राऊत व रायगडमध्ये सुनील तटकरे (राष्ट्रवादी) यांनी अनंत गिते यांचा पराभव केला.



मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ठाण्यात नरेश म्हस्के तर, कल्याणमध्ये डॉ. श्रीकांत शिंदे यांना मोठ्या विजयाप्रत नेले. याच पट्ट्यातील पालघर मतदारसंघात भाजपचे हेमंत सावरा विजयी झाले. भिवंडीत शरद पवार गटाचे बाळ्यामामा म्हात्रे यांनी कपिल पाटील यांना पराभूत केले.

मराठवाडा विभागात ठाकरे गटाचे ओमराजे निंबाळकर (धाराशीव), संजय जाधव (परभणी) व नागेश पाटील (हिंगोली) यांनी महायुतीच्या उमेदवारांवर मात केली. जालन्यात केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांना पराभूत करणारे काँग्रेसचे कल्याण काळे जायंट किलर ठरले. लातूर (शिवाजीराव काळगे) व नांदेड (वसंत चव्हाण) यांनी काँग्रेसचे बळ तीनवर नेऊन ठेवले. छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेच्या संदीपान भुमरे यांनी ठाकरे गटाचे चंद्रकांत खैरे व एमआयएमचे इम्तियाज जलील यांना अस्मान दाखवले. बीडमध्ये शेवटच्या टप्प्यात शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे यांनी भाजपच्या पंकजा मुंडे यांचा पराभव केला.

### तटकरेंनी राखली अजित पवारांची लाज

- रायगडमध्ये विजय मिळवून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी पक्षाध्यक्ष अजित पवार यांची लाज राखल्याचे मानले जात आहे. महायुतीचा घटक असलेल्या राष्ट्रवादी पक्षाने शिवसेनेच्या शिंदे गटा इतक्याच जागा लढायला मिळाव्यात असा आग्रह धरला होता, मात्र त्यांची केवळ ४ जागांवर बोळवण करण्यात आली. त्यातही शिरुरमधील उमेदवार शिवाजीराव अढळराव पाटील ऐन निवडणूकीच्या आधी शिवसेनेतून राष्ट्रवादीत आले होते. विधानसभेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर ही कामगिरी पक्षाच्या भवितव्याच्या दृष्टिने चिंताजनक असल्याचे म्हटले जाते.

विदर्भात काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर (चंद्रपूर), नामदेव किरसन (गडचिरोली चिमूर), शामकुमार बर्वे (रामटेक), बळवंत वानखेडे (अमरावती) व प्रशांत पडोळे (भंडारा गोंदिया) हे विजयी झाले. भाजपची घसरण थेट नऊवरून दोनवर झाली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या रूपाने हमखास मिळणारी नागपूरची एक जागा त्यात आहे. अकोल्यात अनुप धोत्रे यांनी पक्षाचे बल वाढवण्यास हातभार लावला. वर्ध्यात भाजपच्या रामदास तडस यांना राष्ट्रवादी पवार गटाचे अमर काळे यांनी पराभूत केले. बुलढाण्यात शिवसेनेचे प्रतापराव जाधव, तर यवतमाळ वाशिममध्ये ठाकरे गटाचे संजय देशमुख विजयी झाले.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिकमध्ये महायुतीतील घटक पक्षांमध्ये तिकिटावरून रस्सीखेच झाल्यानंतर विद्यमान खासदार हेमंत गोडसे (शिवसेना) यांच्याच गळ्यात उमेदवारीची माळ पडली; मात्र ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे यांनी अपेक्षेप्रमाणे बाजी मारली. दिंडोरीत केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, तर धुळ्यात डॉ. सुभाष भामरे यांना हार पत्करावी लागली. राष्ट्रवादीच्या पवार गटाचे भास्कर भगरे व काँग्रेसच्या डॉ. शोभा बच्छाव यांनी प्रतिस्पर्धी तगड्या उमेदवारांना धूळ चारली. जळगाव (स्मिता वाघ) व रावेर (रक्षा खडसे) या भाजपच्या उमेदवारांनी पक्षाचे अस्तित्व कायम ठेवले. दक्षिण नगरमध्ये नीलेश लंके (शरद पवार गट) व शिर्डीत भाऊसाहेब वाकचौरे (ठाकरे गट) यांनी डॉ. सुजय विखे पाटील व सदाशिव लोखंडे यांचे आव्हान संपुष्टात आणले.

## बालेकिल्ला राखला : सुप्रिया सुळे चौथ्यांदा खासदारपदी

# रामकृष्ण हरी वाजली 'तुतारी'!




■ **ओंकार खेडेकर**

**पुणे :** पुरंदर बारामती लोकसभेचे लढाई शरद पवार आणि अजित पवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची होती. परंतु या लढतीत सुप्रिया सुळे यांनी विजय आपल्या नावे करीत सुनेत्रा पवार यांना पराभूत केले. अवघ्या देशाचे लक्ष या मतदार संघाकडे लागले होते. काका-पुतण्याच्या राजकीय लढाईत अखेर काकांनी विजय मिळाला आहे. या लोकसभा मतदारसंघात ५९.५० टक्के इतके मतदान झाले होते. यंदाच्या निवडणूकीत दीड ते पावणे दोन टक्क्यांनी मतदान कमी झाले होते. मात्र, १ लाख १४ हजार ७६१ इतके मतदान करणाऱ्यांची संख्या वाढली होती. यामुळे यावर्षी मतदारांची संख्या १४ लाख ११ हजार ६२१ पर्यंत वाढली होती. त्यामध्ये ७ लाख ७४ हजार ३८३ म्हणजेच ६२.३५ टक्के पुरुष मतदारांनी मतदान केले, तर ६ लाख ३७ हजार २१९ म्हणजे ५६.३६ टक्के मतदान महिलांनी केले. या मतदारसंघात एकूण ६ विधानसभांचा समावेश होतो. यामध्ये

**»पुरंदर विधानसभा**

बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर-हवेली, भोर-मुळशी-वेल्हा, इंदापूर आणि खडकवासला हे मतदारसंघ येतात.

**वाढलेले मतदार ठरले विजयाचे गमक**

बारामती लोकसभा मतदारसंघात २०१९ पेक्षा यंदा तब्बल १ लाख १४ हजार ७६१ ने मतदान केलेल्यांची संख्या वाढली आहे. ही वाढलेली मते या निवडणुकीत निर्णायक ठरली आहेत. २०१९ मध्ये या मतदारसंघात ६१.७ टक्के इतके मतदान झाले होते. यावेळी तब्बल दीड ते पावणे दोन टक्क्यांनी मतदान कमी झाले असले, तरी १ एक लाख १४ हजार ७६१ ने मतदान करणाऱ्यांची संख्या वाढली होती. यामुळे या वाढलेल्या मतदारांमुळे सुप्रिया सुळे चौथ्यांदा बारामती लोकसभेच्या खासदार झाल्या आहेत. खरंतर ही निवडणूक जरी सुप्रिया सुळे vs सुनेत्रा पवार यांच्यात असली तरी पवार विरूद्ध पवार असे चित्र निवडणूकीवेळी तयार करण्यात आले. दोन्ही उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर प्रचार यंत्रणा राबविण्यात आली होती.

**मतदानाची टक्केवारी**

| मतदारसंघ | २०१९ | २०२४ |
|---|---|---|
| दौंड | ६४.०५ | ६०.२९ |
| इंदापूर | ६४.३९ | ६७.१२ |
| बारामती | ७०.२४ | ६९.४८ |
| पुरंदर | ६०.४८ | ५३.९६ |
| भोर | ६०.८४ | ६०.११ |
| खडकवासला | ५३.२० | ५१.५५ |
| एकूण | ६१.५४ | ५९.५० |

**प्रभावी ठरलेले मुद्दे**

- पक्षफुटी मुद्यावर भर देण्यात आला होता.
- मराठा, धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीच्या मुद्द्याने जोर धरला.
- दौंड, इंदापूर, पुरंदर आणि बारामतीच्या काही दुष्काळी पट्यातील सततचा दुष्काळ
- भोरच्या एमआयडीसीचा रखडलेला प्रश्न
- कात्रज बोगदा ते चांदणी चौक मार्गे देहू रस्त्यावर सततच्या वाहतुककोंडीचा प्रश्न



## अजित पवारांना 'आत्मपरीक्षणाची गरज'

■ **पाकिजा पठाण**

संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांनी दणदणीत विजय मिळवला असून, यामुळे सुनेत्रा पवार यांचे खासदार होण्याचे स्वप्न धुळीला मिळाले आहे. भाजपने या मतदारसंघाकरिता गेल्या अनेक दिवसापासून कंबर कसली होती व आपले सर्व डावपेच बारामती

**»दौंड विधानसभा**

लोकसभा मतदारसंघावर केंद्रित केले होते. परंतु, त्याच्यावर पाणी फिरले आहे. बारामती लोकसभा मतदारसंघ हा शरद पवार यांचा बालेकिल्ला समजला जातो. अजित पवार यांनी साथ सोडल्याने शरद पवार यांना आपली कन्या सुप्रिया सुळे यांनी हा मतदारसंघ पिंजून काढला व साठ वर्षांच्या राजकारणातील आपला अनुभव त्यांनी या निवडणुकीमध्ये पणाला लावला होता आणि सुप्रिया सुळे यांना प्रचंड मताने निवडून आणले. बारामती लोकसभा मतदारसंघावर गेल्या अनेक वर्षांपासून शरद पवार यांचे वर्चस्व आहे. परंतु भारतीय जनता पार्टीने शरद पवार यांचे राजकारण संपवण्याकरिता मोठी कंबर कसली होती. भाजपचे सर्व डावपेच खेळूनदेखील बारामतीमध्ये सुप्रिया सुळे यांना पराभूत करण्यात अपयश आले आहे. त्यामुळे पवार ते पवारच असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खरेतर यावेळी ही निवडणूक जनतेने हातात घेतली होती. या विजयाचे गमक म्हणजे सुप्रिया सुळे यांनी गेल्या तीन वर्षांपासून या मतदारसंघात आपला संपर्क वाढवला होता. अगदी तळागाळातील जनतेशी सुप्रिया सुळे या संपर्कात होत्या. उलट त्यांच्या विरोधी उमेदवार सुनेत्रा पवार या मात्र ठराविक कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेत असल्याचे पाहिला मिळाले. त्यामुळे त्यांच्याबद्दल जनतेच्या मनात एकप्रकारचा रोष निर्माण झाला होता. हा रोष मतदारांनी मतपेटीतून व्यक्त केला आहे. त्यामुळे आता अजित पवारांना येणाऱ्या काळात आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, हे मात्र निश्चित.

## तालुक्यातून जवळपास २६ हजारांचे सुळेंना मताधिक्य

■ **सागर शिंदे**

लोकसभेच्या रिंगणात शरद पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे व कर्मयोगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन भरतशेठ शहा यांनी प्रवेश केला होता. त्यावेळी त्यांनी शब्द दिला होता की, इंदापूर शहरासह तालुक्यातून खासदार सुप्रिया सुळे यांना मताधिक्य देणार म्हणून, त्यांनी दिलेला शब्द खरा ठरवला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला इंदापूर तालुक्यातून मोठी ताकद मिळाली आहे.

**»इंदापूर विधानसभा**

खासदार सुप्रिया सुळे यांना इंदापूर शहरातून जवळपास पोस्टल मतदानासह २ हजार ६० पेक्षा अधिक मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे व भरत शहा, अप्पासाहेब जगदाळे समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. १९ व्या फेरीअखेर सुप्रिया सुळे ७१ हजार मतांनी आघाडीवर होत्या. खासदार सुप्रिया सुळे यांना मिळालेले मताधिक्य विधानसभानिहाय बारामती विधानसभा- ४८१६८, इंदापूर विधानसभा- २५६८९, दौंड विधानसभा- २४२६७, पुरंदर विधानसभा- ३४३८७, भोर विधानसभा- ४१६२५ असे एकूण १ लाख ५३ हजार ४८ मतांनी सुप्रिया सुळे चौथ्यांदा बारामतीच्या खासदार झाल्या आहेत.



## बारामती शहरातील चौकाचौकात 'आनंदोत्सव'

■ **संजय भिसे**

बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा अजित पवार यांचा दारूण पराभव झाला. देशामध्ये प्रतिष्ठेची ठरलेली बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक सुप्रिया

**»बारामती विधानसभा**

सुळे यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकल्यामुळे शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मोठा आनंदोत्सव साजरा केला. बारामतीच्या चौका-चौकात गुलाबाची उधळण करण्यात आली. बारामतीतील या लढाईत निवडणुकीमध्ये एकीकडे सर्व कार्यकर्ते आणि दुसरीकडे मतदार असे समीकरण झाल्याचे स्पष्ट झाले. बारामतीसह इंदापूर, दौंड, पुरंदर, भोर, वेल्हा, मुळशी या विधानसभा मतदार संघातही सुप्रिया सुळे यांना चांगले मताधिक्य मिळाले असून, केवळ खडकवासला येथे त्या काही प्रमाणात मागे पडलेल्या होत्या. सुप्रिया सुळे यांच्या या विजयानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, काँग्रेस आणि त्यांच्या सहयोगी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी चौका-चौकात एकच जल्लोष केला. पक्षाच्या विभाजनानंतर राष्ट्रवादीची दोन्ही कार्यालये अजित पवारांनी ताब्यात घेतली होती. आज या दोन्ही कार्यालयात पूर्णपणे सामसूम दिसत होती.


**जाहीर नोटीस**

तमाम सर्व लोकांना विशेषत: गांव मौजे बारामती, ता. बारामती, जि.पुणे व बारामती तालुक्यातील व पुणे जिल्ह्यातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री. विश्वनाथ कृष्णाजी भुजबळ, रा.बारामती, ता. बारामती, जि.पुणे यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांच्या मालकीची असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलांस देवून सदर मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तशी विसारापोटी रक्कम स्विकारून विसार पावती करून देवून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, करार, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, विसार पावती, ताबा, खरेदी, लीज, लीन, पोटगी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधीतांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येवून खात्री करून द्यावी व लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे समजून तसेच असे कोणाचेही हक्क वा अधिकार असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन**

तुकडी पुणे, पोट तुकडी, ता.बारामती, जि.पुणे मे. दुय्यम निबंधक सो. बारामती यांचे हद्दीतील गांव मौजे बारामती, ता. बारामती, जि. पुणे येथील बारामती नगरपरिषद हद्दीतील विदयमान मालक यांच्या मालकीची सिटी सर्व्हे नं. १२९० क्षेत्र ११.०० चौ.मी. व त्यावरील बांधकाम ही मिळकत, यांसी चतु:सिमा-मूळ सरकारी रेकॉर्डप्रमाणे, सर्व तदंगभूत वस्तूसह व सर्व इजमेंटचे हक्कासह, तसेच रस्ता वापर वहीवाट करण्याचे हक्कासह.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिली असे

दि.०४/०६/२०२४

सही/-

**(ॲड. अमिताभ सुरेशचंद्र मेहता)**

(मो.नं. ९३७२४४८०४४)


## आमदार संग्राम थोपटेंच्या पाठिंब्यामुळेच सुप्रिया सुळेंना भोरमधून मताधिक्य

■ **वैभव धावडे पाटील**

**»भोर विधानसभा**

राज्यातील सर्वात प्रतिष्ठेची लढाई ही बारामती लोकसभा मतदारसंघात झाली. काका-पुतण्याच्या प्रतिष्ठेच्या लढाईत मतदारांची काकांना भावनिक साद मिळाली. भोर विधानसभेचे आमदार संग्राम थोपटे निवडणूकीत सर्वस्वी वाहून घेऊन मनापासून काम केल्याने भोर मतदारसंघात सुप्रिया सुळे यांना भोर मतदारसंघात सुप्रिया सुळे यांना १३४२४५ सुनित्रा पवार यांना ९०३४० मते पडली. सुळे यांना ४३९०५ मताधिक्य मिळाले. सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांना पराभूत केले. निवडणुकाचे शरद पवार यांनी गांभिर्य ओळखून माजीमंत्री अनंतराव थोपटे यांची भेट घेतली. तीस वर्षांचा कट्टर विरोधक म्हणून पाहिले जाणाऱ्या अनंतरावांशी मन जुळवणी केली. सुप्रिया सुळे यांच्या लोकसभेच्या या प्रचारामध्ये मनापासून काम करून अजित पवार यांच्या पत्नी सुनित्रा पवार यांना विरोध दर्शविला. आगामी येणाऱ्या विधानसभा डोळ्यांसमोर ठेऊन आपल्या मतांची बेरीज जोपासली. बारामती ४८१६८ मताधिक्य खालोखाल भोर मतदारसंघाने ४३९०५ मताधिक्य दिले. भोर मतदारसंघातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी गावागावात विजयउत्सव गुलाल फटाके फोडून साजरा केला. राष्ट्रवादीचे सर्व आमदार संग्राम थोपटे यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना नेते कुलदिप कोंडे, बँकेचे संचालक, दुध संघाचे संचालक, इतर पदाधिकारी एकरूप होऊन सुनित्रा पवार यांच्यासाठी आली. ही निवडणूक आमदार संग्राम थोपटे यांच्या पाठिंब्यामुळे एकतर्फी झाली आसल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

## कोणती लाट? नाही कोणाचा थाट, बुजुर्ग नेतृत्वासाठी मतदार राजाचाच घाट !

■ **सुनील जगताप**

५० वर्षांची संसदीय व राजकीय कारकीर्द पणाला लावलेल्या, ८४ वर्षांच्या शरद पवारांनी महाराष्ट्रामध्ये वेगळा इतिहास घडवून भल्या भल्यांच्या तोंडचे पाणी पळवले आहे. नाही कोणती लाट, नाही कोणाचा थाट, बुजुर्ग

**»शिरूर विधानसभा**

नेतृत्वासाठी मतदार राजाचाच घाट अशी ही निवडणूक आगळी वेगळी झाली आहे. या निवडणुकीसाठी महाराष्ट्राचा विचार करता, महाराष्ट्रात दोन पक्षांची दोन-दोन शकले होत, चार पक्ष नव्याने उदयास आले. तर भाजप व काँग्रेस असे सहा पक्ष निवडणुकीच्या रिंगणात होते. यामध्ये राष्ट्रवादीचे दोन गट, शिवसेनेचे दोन गट, भाजप आणि काँग्रेस हे महत्त्वाचे मुख्य पक्ष या निवडणुकीत सहभागी झाले होते, शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी डॉ. अमोल कोल्हे हे शरद पवार गटाकडून उभे होते. तर दल बदलूपणा करीत ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटामध्ये सामील झालेले व या लोकसभा मतदारसंघाचे तीन वेळा प्रतिनिधित्व करणारे शिवाजीराव आढळराव पाटील हे पाचव्यांदा आपले नशिब आजमावण्यासाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून या निवडणुकीला उभे होते. अतिशय चुरशीची अशी ही लढत झाली. या लोकसभा मतदारसंघांमध्ये पाच आमदार महायुतीच्या बाजूने होते, तर अशोक पवार हे एक मात्र आमदार शरद पवारांच्या बाजूने निष्ठेने उभे होते. त्यामुळे त्यांच्या राजकीय अस्तित्वाचा व भवितव्याचा प्रश्न या ठिकाणी निर्माण झाला होता. डॉ. अमोल कोल्हे यांच्या विजयाने आ. अशोक पवार यांच्यासाठी विधानसभेसाठीच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.


**जाहीर नोटीस**

तमाम सर्व लोकांना विशेषतः वडगाव निंबाळकर, ता. बारामती, जि. पुणे व बारामती तालुक्यातील व पुणे जिल्ह्यातील सर्व लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि १. कोसर फिरदोशखान पठाण, २. शमा जावेद सय्यद, ३. इर्शाद बशीरखान पठाण, ४. अकिल बशीरखान पठाण ५ मिनाज इम्तियाज पठाण. ६. महेवीस इम्तियाज पठाण व ७. तसलीम इम्तियाज पठाण तर्फे अपाक आई मिनाज व ८. सुरैय्या जब्बार पठाण यांच्या मालकीची असून त्यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तशी बोलणी करून आमचे अशिलांकडून विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. विद्यमान मालक यानी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, रजिस्टर अथवा अनरजिस्टर गहाण, दान, बक्षीस, करार, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, विसार पावती, तात्रा, खरेदी, लीज, लीन, पोटगी, दावा किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध अथवा चतु:सिमेबाबत काहीही वाद वगैरे असल्यास संबंधीतांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ (आठ) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येवून खात्री करून द्यावी व लेखी हरकत घ्यावी, अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे. असे समजून तसेच असे कोणाचेही हक्क वा अधिकार असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी व ता.बारामती व मा. दुय्यम निबंधक सो बारामती यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे व तालुका पंचायत समिती बारामती यांचे हद्दीतील गांव मौजे वडगाव निंबाळकर, ता. बारामती, जि. पुणे येथील १अ) सिटी सर्व्हे नं.८८० यांसी क्षेत्र १६५५.०८ चौ.मी, सत्ताप्रकार अ यांसी चतु:सिमा पूर्व- सिटी सर्व्हे नं ८७८, ८७९, ९६४,९६५ व रस्ता, पश्चिम- ८८१,८८३ व ८८६ दक्षिण- मोकळी जागा, उत्तर- रस्ता. या मिळकतीपैकी उपरोक्त मालक नं. १ ते ७ यांच्या मालकीची १८३.९१ चौ.मी मिळकतीपैकी १००.०० चौ.मी म्हणजेच १०००.०० चौ. फुट मिळकत यांसी चतु:सिमा पूर्व- सिटी सर्व्हे नं. ९६४,९६५,पश्चिम- अंतर्गत १५ फुटी रस्ता व अनिस पठाण यांचे क्षेत्र, दक्षिण रशीद पठाण यांचे क्षेत्र, उत्तर- १० फुटी रस्ता व अजीज पठाण व हसन पठाण यांचे क्षेत्र हि मिळकत पश्चिमेकडील अंतर्गत १५ फुट रुंदीच्या रस्त्याने वहिवाट करण्याच्या हक्कासह मिळकत व उपरोक्त मालक नं.८ यांच्या मालकीची संपूर्ण ४५.९७ चौ.मी मिळकत यांसी चतु:सिमा पूर्व- सिटी सर्व्हे नं. ९६४,९६५,पश्चिम- अंतर्गत १५ फुटी रस्ता व अनिस पठाण यांचे क्षेत्र, दक्षिण - सि. स नं. पैकी अजीज पठाण व हसन पठाण यांचे क्षेत्र, उत्तर - सि.स नं.पैकी अजीज पठाण व हसन पठाण यांचे क्षेत्र हि मिळकत पश्चिमेकडील अंतर्गत १५ फुट रुंदीच्या रस्त्याने वहिवाट करण्याच्या हक्कासह मिळकत १ब) सिटी सर्व्हे नं. ८८१ यांसी क्षेत्र १६५५.०८ चौ.मी, सत्ताप्रकार अ यांसी चतु:सिमा पूर्व- सिटी सर्व्हे नं. ८८० व रस्ता, पश्चिम- ८८१, ८८३ व ८८६ दक्षिण- सि.स नं. पैकी अजीज पठाण व अनिस पठाण, उत्तर- रस्ता. या मिळकतीपैकी उपरोक्त मालक नं.८ यांच्या मालकीची ०२.०८ चौ.मी मिळकत यांसी चतु:सिमा पूर्व- सिटी सर्व्हे नं.८८० व रस्ता, पश्चिम- सि.स नं. पैकी रशीद पठाण यांची मिळकत, दक्षिण- सि.स नं. पैकी अजीज पठाण व अनिस पठाण, उत्तर- रस्ता हि मिळकत उत्तर व पूर्वेकडील अंतर्गत १५ फुट रुंदीच्या रस्त्याने वहिवाट करण्याच्या हक्कासह मिळकत हि या जाहीर नोटीसीचा विषय असे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिली असे

दि. ०४/०६/२०२४.

सही/-

**(ॲड. सुनिल सोपाना आटोळे)**

ऑ.नं. १४, संघवी हाईटस्,

भिगवण रोड, बारामती, जि. पुणे.

मो. नं. ९८६००९०२८४


## पवार फॅक्टरमुळे विजय

**»खेड विधानसभा**

■ **अमितकुमार टाकळकर**

शिरूर लोकसभा निवडणूकीच्या सुरूवातीला माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना एकतर्फी वाटणारी निवडणूक डॉ. अमोल कोल्हे यांनी स्वतःच्या राजकीय कौशल्याने एकहाती फिरवली. आढळराव यांनी 'धनुष्य' सोडून 'घड्याळ' बांधल्याने मतदारांनी हातात 'हात' घालून जोरदार विजयाची 'तुतारी' वाजवली आहे. या निवडणुकीत 'शरद पवार फॅक्टर' हा टर्निंग पॉईंट' ठरला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिष्ठाच्या केलेल्या या निवडणुकीत आमदार दिलीप मोहिते यांचा 'निकाल' लागला. मोहिते यांना कायम पाण्यात पाहणारे भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे, तालुकाध्यक्ष शांताराम भोसले आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर व तालुकाप्रमुख राजेश जवळेकर यांची मोहिते यांच्याबरोबरची सलगी मतदारांना भावली नाही. खेड तालुक्याची राजधानी असलेल्या राजगुरूनगर शहरात आढळराव यांनी साधी पदयात्रा देखील काढली नाही. तसेच एकही मोठी सभा या परिसरात त्यांनी घेतली नाही. मतदारांना गृहीत धरण्याची चूक आढळराव यांना या निवडणूकीत चांगलीच भारी पडली. पूर्वश्रमीचे भाजप नेते अतुल देशमुख यांनी शरद पवार गटात केलेला प्रवेश कोल्हे यांच्या विजयाची नांदी ठरला. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने तन-मन-धनाने कोल्हे यांच्यासाठी जीवाचे रान केले. चाकणच्या सांगता सभेतील शरद पवार, आदित्य ठाकरे व बाळासाहेब थोरात यांच्या प्रेरणादायी भाषणांनी जनता प्रभावित झाली.


**राजेंद्र कचरे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार श्री. धोंडीराम कोंडीबा राजीवडे रा. राजीवाडी ता. भोर जि. पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांची आई कै. चंद्रभागा कोंडीबा राजीवडे यांचा मृत्यु मौ. राजीवडी ता. भोर जि. पुणे येथे दि. १५/०६/१९९७ रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. २०/०५/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यु/एस. आर /७ /२०२४

दिनांक :- २०/०५/२०२४

ठिकाण :- भोर

सही/-

**(राजेंद्र कचरे**

**उपविभागीय अधिकारी तथा**

**दंडाधिकारी भोर उपविभाग भोर**

**राजेंद्र कचरे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद कारणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार श्री. धोंडीराम कोंडीबा राजीवडे रा. राजीवाडी ता. भोर जि. पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३ (३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांचे वडील कै. कोंडीबा रावजी राजीवडे यांचा मृत्यु मौः राजीवडी ता. भोर जि. पुणे येथे दि. १५/०६/१९९७ रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. २०/०५/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज / मृत्यु / एस. आर / 6 / २०२४

दिनांक :- २०/०५/२०२४

ठिकाण :- भोर

सही/-

**(राजेंद्र कचरे**

**उपविभागीय अधिकारी तथा**

**दंडाधिकारी भोर उपविभाग भोर**


खा.मुरलीधर मोहळ
बहूमताने
विजयी झाल्याबद्दल
हार्दिक शुभेच्छा!
: शुभेच्छुक :
श्री. संदीप खर्डेकर
● महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता, भारतीय जनता पार्टी
● समन्वयक, महायुती, पुणे शहर, शिरूर व बारामती लोकसभा.
● मा.अध्यक्ष, संचालक, उद्यम विकास सहकारी बँक.
● अध्यक्ष, क्रीएटिव्ह फौंडेशन
● ट्रस्टी, कर्वे समाज सेवा संस्था
● संचालक, Hi5 ब्रॉडबँड सोल्यूशन्स
● प्रोप्रायटर,प्रणेती ईस्टेट कंसल्टंटस
● पंचरत्न कॅन्स्ट्रक्शन, बांधकाम व्यवसायिक
● संचालक, मॅगनम सोलर पॉवर
● संस्थापक,ॲलर्ट (एन जी ओ )
● अध्यक्ष, रोलबॉल संघटना महाराष्ट्र


पुणे जिल्हा रिटेल, व्यापारी संघ
पुणे शहरात व्यापारी क्षेत्रात आनंदोत्सव,
तर देशातील व्यापारी खुश
पुण्यात खा.मुरलीधर मोहळ,
आणि दिल्लीत व्यापारी
नेते राष्ट्रीय महामंत्री
प्रविणजी खंडेलवाल
प्रचंड बहूमताने
विजयी झाल्याबद्दल
हार्दिक
अभिनंदन!
: शुभेच्छुक :
सचिन निवंगुणे
अध्यक्ष, महाराष्ट्र कॅट
संस्थापक अध्यक्ष पु.जि.री.व्या. संघ
सुनिल गेहलोत
शहर अध्यक्ष
विकास मुंदडा
जिल्हा अध्यक्ष, कॅट
नवनाथ सोमसे
जनरल सेक्रेटरी
संतोष राऊत
कोषाध्यक्ष
कुमार खत्री
कार्याध्यक्ष


कसबा आमचाच!
अन् पुणेही आमचेच!
नवनिर्वाचित
खासदार मुरलीधर
मोहोळ यांच्या
विजयाने कसबा
पोट निवडणुकीचा
निकाल हा एक
अपघात होता हे
सिद्ध झाले...
शुभेच्छुक : हेमंत रासने मित्रपरिवार, कसबा
कसबा विधानसभा मतदारसंघ, पुणे


खासदार मुरलीधर मोहोळ
यांच्या
ऐतिहासिक
विजयाबद्दल
हार्दिक
अभिनंदन!
शुभेच्छुक
श्री. निलेशभाऊ कदम
अध्यक्ष, अखिल बुधवार पेठ दहिहंडी उत्सव ट्रस्ट, नमो नमः युवा मंच
सौ. रूपाली निलेश कदम
अध्यक्ष, भा. ज. पा. प्रभाग क्र. १५ महिला आघाडी
गणेश बाठे, सुमित मावळे, हिमांशु सपकाळ, शुभम साठे, रोनक तावरे, प्रथमेश कदम,
रोहित हागवणे, अनिरुध्द सणस, अथर्व सपकाळ, अमित देशपांडे, चारुदत्त तेलंगी,
कपिल वडके, अक्षय गुजर, साहिल वाडकर, ऋषभ अगरवाल, समर्थ शेवाळे,
सिध्दार्थ सांगळे, साहिल गोळे, स्वप्निल जोशी, यश काटे, वैभव काने, शशांक कदम.